# कृषितीर्थ

डिसेंबर २०२२ • वर्ष ५ • अंक १२ • जळगाव • पृष्ठे ६० • मूल्य ₹१०






"निर्सगाचे शोषण न करता व पर्यावरणाची हानी न करता उत्पादन तंत्राकडे आणि विकासावर लक्ष केंद्रीत करू तो चिरतंन व शाश्वत कसा राहील याची काळजी पुढील काळात आपल्याला घ्यावीच लागेल."

– भवरलाल जैन

# संकटांशी लढण्याची भाऊंची तत्वे प्रेरणादायी !

**अध्यक्षीय**



**अशोक जैन**
अध्यक्ष, जैन इरिगेशन सिस्टीम्स् लि.

व्यवसाय आणि उद्योगधंद्यात चढउतार हे नेहमीच होत असतात. या बदलांमागे अनेक कारणे असतात. या कारणांचा शांतपणे विचार करून त्यांच्यावर कशी मात करायची व संकटाचे संधीत कसे रूपांतर करायचे याचा निर्णय वेळीच घ्यावा लागतो. त्यासाठी मजबूतीने धोरणांची उतरंड रचावी लागते आणि खंबीरपणे, मनोधैर्य खचू न देता व न डगमगता सभोवतालच्या परिस्थितीचा विचार करून उभे रहावे लागते. त्याचवेळी प्रामाणिकपणाची कास धरून व ग्राहकांची सेवा हीच ईश्वर सेवा आहे असे मानून त्यांचा विश्वास संपादन करावा लागतो. याच मार्गावर जैन इरिगेशनचे संस्थापक अध्यक्ष व आमचे परमपूज्य पिताजी भवरलाल जैन उर्फ मोठे भाऊ चालत राहिले.

भारतासारख्या विकसनशील देशात साधनसामुग्रीची कमतरता, ही तर नित्याचीच बाब आहे. मग ती साधनसामुग्री नैसर्गिक असो, मनुष्यबळविषयक असो, की आर्थिक असो, भांडवल उभं करता करताच माणसं दमून जातात. शिवाय अनेक सरकारी परवानग्या कनवटीलाच बसलेल्या असतात. त्यांची पूर्तता झाल्याशिवाय व्यवसायाचा प्रारंभ करता येत नाही. म्हणजे सुरुवातीचा सहा महिने - वर्षभराचा काळ पूर्वतयारीतच जातो. व्यवसाय सुरू करताना जिद्द आणि इच्छाशक्ती सोडली तर मुबलकता कशाचीच नसते, त्यामुळे कमतरतेतून विपुलता निर्माण करायचे आव्हान समोर ठाकलेले असते. इतक्या निष्ठुर वातावरणात काम करताना एखादा कितीही पक्का, मुरलेला, कडक स्वभावाचा अनुभवी व्यावसायिक असला तरी त्याच्यावरही काही प्रसंगी व काही क्षणी हार पत्करण्याची, खचून जाण्याची, नाउमेद होण्याची, पश्चात्ताप करण्याची पाळी येत असते. कधी कधी खूप मनस्ताप होतो. सगळे काही सोडून द्यावे असे वाटते. माणूस एकाकी पडतो. खचून जातो. जणू काही सगळे निर्माण झालेले वातावरण सहनशक्तीचा अंत पाहणारे असते. भोवतालचे बरेच लोक तर गंमत पाहणारेच असतात. मनापासून मदत करणारे फार थोडे असतात. जे आपल्याला जवळचे वाटत असतात तेही कधी कधी परीक्षकाच्या भूमिकेत गेले की काय असे वाटण्यासारखे वागू लागतात. मग काही वेळा कुणाला आपले म्हणावे अन कुणाला परके म्हणावे अशी परिस्थिती निर्माण होते. हा सगळा प्रसंग आणि काळ बिकट असतो. सल्लागारांचे तर इतकं पेव फुटलेलं असतं की कुणाकुणाचे सल्ले ऐकावेत असा प्रश्न काम करणा-यालाच पडतो. अशा अस्थिर व गोंधळलेल्या वातावरणात जराही खचून न जाता स्थितप्रज्ञासारखे शांत राहून आपले काम अविचलपणे जे पुढे रेटत राहतात ते अडचणीच्या परिस्थितीवर निश्चित मात करू शकतात. प्रतिकूल परिस्थितीतही हिंमत न सोडण्याची त्यांची वृत्तीच त्यांना स्वत:ला सावरत पुन्हा उभं राहण्याचं बळ देते, हेच खरं. बाहेरचं असं अगदी टोकाचं वातावरण आणि सत्वपरीक्षा पाहणारे प्रसंगच त्यांना यशस्वी होण्यासाठी अंत: प्रेरणा देतात. आजूबाजूला घडत असलेल्या घटनांचा मनावर परिणाम होऊ न देता, परिस्थितीचा निष्क्रिय बळी न ठरता जे दमदारपणाने सावध भूमिका घेत पाऊले टाकून संदिग्ध परिस्थितीची सूत्रे स्वतःच्या हाती घेतात आणि स्वतःला हव्या त्या पद्धतीने परिस्थितीला वाकवितात तेच शेवटी यशस्वी होऊन आपल्या अंतिम लक्ष्य व ध्येयापर्यंत पोहचू शकतात. हे सगळे आज पुन्हा एकदा आठवलं ते आमचे परमपूज्य पिताजी व जैन इरिगेशनचे संस्थापक स्वर्गीय भवरलाल जैन उर्फ मोठे भाऊ यांच्या जयंतीमुळे, भाऊंनाही अनेक वेळा निरनिराळया संकटांचा सामना करावा लागला. संकटे कधी एकेकटी येत नाहीत. अनेक संकटे एका वेळी धाऊन येतात याचाही त्यांनी अनुभव घेतला. पण संकटे आली म्हणून ते कधी डगमगले नाहीत, खचले नाहीत आणिहातपाय गाळूनही बसले नाहीत. स्वतःला सावरण्याची शक्ती, चिकाटी आणि संशोधनाचा आधार घेत सतत काहीतरी नवे करीत राहण्याचा ध्यास व वृत्ती यातून वाटयाला आलेल्या कठोर परिस्थितीशी ते झगडत राहिले. त्यांतून व्यवसाय सावरत नेला. लोकांना दिलेला शब्द पूर्ण केला. सगळ्यांच्या उधा-या चुकत्या केल्या. व्यवसाय पूर्वपदावर आणताना केवळ स्वतः चाच उत्कर्ष साधण्याचा विचार न करता आपल्याबरोबर आपल्या समवेत विश्वासाने राहिलेल्या शेतकरी समाजालाही ते बरोबर घेऊन गेले. आव्हानांना संधी मानून त्यांचा उपयोग विकास साधण्यासाठी करायचा, लादल्या गेलेल्या परिस्थितीला वाकवून स्वतःच्या कामासाठी तिचा वापर करायचा आणि सतत बदलत्या वातावरणाचाही शांत राहून स्वीकार करीत आव्हानांचेच परिवर्तन उपायांमध्ये रूपांतर करण्याची किमया जी मोठ्या भाऊंनी दाखविली तोच आदर्श समोर ठेवून आपल्याला पुढची वाटचाल करायची आहे. या वाटचालीसाठी भाऊंचा आणि आपल्या सर्वांचा आशीर्वाद आम्हांला मिळत राहो एवढीच अपेक्षा ! सर्वांना नमस्कार.



# भवरलालजींच्या संशोधनाची आस नोबेलच्याही पलिकडची !

## संपादकीय

ग्राहकांच्या खाण्यापिण्याच्या सवयी, आवडीनिवडी यात सातत्याने बदल होत असल्यामुळे बाजारपेठेतील मागणी पुरवठ्यातही मोठ्या प्रमाणात चढ-उतार होतांना दिसतात. असे बदल वारंवार होऊ लागले तर मालाचे उत्पादन करणाऱ्या कंपन्या व उद्योजकांना उत्पादनात सातत्य कसे राखायचे? हा प्रश्न भेडसावू लागतो. ग्राहकांच्या मागणीप्रमाणे उत्पादनात तातडीने बदल करणे अपरिहार्य आणि अनिवार्यच असते. जे उद्योजक असे बदल तात्काळ करतात व काळाप्रमाणे बदलतात तेच स्पर्धेत टिकतात. ताठर भूमिका घेऊन बदल न करणारे उद्योग स्पर्धेत मागे पडतात. नाविन्यपूर्ण संशोधनाचे प्रखर पाठबळ निर्माण केलेली आणि काळाशी सुसंगत धोरण स्विकारून व्यवसायात लवचिकता बाळगणारे आणि तरीही आपल्या मुळ सिद्धांत व ध्येयवादाला तिलांजली न देता मूल्यांची चौकट सांभाळणारे जे काही उद्योजक भारतात निर्माण झाले त्यात जळगांवच्या भवरलालजी जैन यांचे नाव आवर्जून घेतले जाते. त्यांची संशोधनामागील भूमिका व कार्य याचा वाढदिवसानिमित्त घेतलेला हा धावता आढावा...



**डॉ. सुधीर भोंगळे**
संपादक

आखीवरेखीव आणि योजनाबद्ध प्रयत्नांनी केलेले संशोधन क्वचितच तांत्रिकदृष्ट्या किंवा एक व्यावसायिक मॉडेल म्हणून यशस्वी होते. या उलट अचानकपणे सुचलेलं, आधीपासून न ठरलेलं आणि कोणतेही तत्व मनात न धरून ठेवता केलेले संशोधन निश्चितच व काही प्रमाणात का होईना यशस्वीतेच्या दिशेने पाऊल टाकतंच आणि वेळप्रसंगी ग्राहकांच्या पसंतीला हमरवास उतरतंच! काळाची पाऊले कशी पडतील याची कल्पना कुणालाच नसते आणि आपल्यासारख्या सामान्य माणसांना तर नसतेच नसते. माणूस जन्माला येताना सामान्यच असतो. पण त्या अफाट सामान्य जनसमुदायात काही माणसे काळाच्या ओघात आपल्या कर्तृत्वाने काळावर आपला ठसा तर उमटवितातच पण त्याचबरोबर विश्वाच्या भविष्यातील विकासवाटा देखील निश्चित करीत असतात. अशा व्यक्ती कालातीत तर बनतातच, त्याचबरोबर काळपुरुषाचा एक भाग बनून ते राहतात. आपण अशी व्यक्ती शतकातून एखादीच जन्माला येते असे सहजपणे म्हणून जातो पण कालोघात ते अंतिम सत्यही असते. अशा व्यक्तिंचे चरित्र स्फूर्तिदायक तर असतेच, पण त्याशिवाय विज्ञाननिष्ठ जीवनाचे एक सुंदर आणि मूर्तिमंत उदाहरणही असते. याचा अनुभव जळगावच्या जैन इरिगेशन कंपनीचे संस्थापक अध्यक्ष भवरलाल जैन यांच्या जीवन, कार्यकर्तृत्व व विचारांमधून आपण सारेजण घेत आहोत.



१२ डिसेंबर हा भवरलाल जैन उर्फ मोठे भाऊ यांचा जन्मदिवस. म्हणजे आजच्या भाषेत वाढदिवस. वाढदिवस केवळ जन्माच्या तारखांनी मोजायचा नसतो. देहाने हयात नसलेल्या व्यक्तिच्या बाबतीत ती मोजदाद विचार, कार्यकर्तृत्व, समाजावरचे ऋण, विपरीत परिस्थितीवर केलेली मात, त्यासाठी शोधलेल्या संशोधनाच्या नवीन वाटा, केलेली साधना व उपासना व त्यातून आत्म्याने घेतलेली झेप यावरून करायची असते. या वर्षात मी काय चांगले नि काय वाईट केले याच्या चिंतनशील जमाखर्चाचा दिवस म्हणजे वाढदिवस. अंतर्मुख होऊन विचार करायला लावणारा हा दिवस. मोठ्या भाऊंच्या या वाढदिवसाच्या निमित्ताने त्यांच्या संशोधक वृत्तीचा व संशोधन कार्याचा धावता आढावा आपण या संपादकीयमधून घेणार आहोत. सविस्तर आढावा घ्यायचा झाल्यास त्यासाठी प्रत्येक विषयावर (उदा. पाईप निर्मिती, ठिबक व तुषार सिंचन साहित्य निर्मिती, पेपेन निर्मिती, फूड प्रोसेसिंग, जैन हिल्सची निर्मिती, पाणलोट विकास व मृदसंधारण, वनीकरण, सघन व

> "Need of the hour is to address through research, individually and collectively the various issues that mankind is facing today. Research is one of the most exciting and rewarding of occupations. Those who believe in innovation believe in research.!"
>
> नवनिर्मिती व निरनिराळ्या प्रश्नांच्या सोडवणुकीसाठी माणसाला व्यक्तिशः आणि सामुदायिकरीत्या संशोधनाचाच आधार घ्यावा लागतो. औत्सुक्य वाढवून सन्मानाचा तुरा बहाल करणारे क्षेत्र म्हणजे संशोधन. नाविन्याचा शोध घेण्यावर श्रद्धा ठेवणारेच संशोधनावर विश्वास ठेवतात.



अतिसघन पद्धतीने फळबागांची लागवड, सौर उर्जा निर्मिती बायोएनर्जी, सेंद्रीय व गांडूळ खत निर्मिती, टिश्यूकल्चर पद्धतीने रोपांची निर्मिती, गांधीतीर्थ व अनुभूती स्कूलची उभारणी.) एकेक स्वतंत्र ग्रंथ लिहावा लागेल. त्या त्या विषयातील जाणकारांना हे काम करावे लागेल. या सर्व विषयांबाबतची माझी जाणकारी अत्यंत मर्यादित असल्यामुळे मी येथे संशोधनापुरता विषय स्तिमीत ठेवला आहे. संशोधन हा ही विषय खूप मोठा व अवाढव्य आहे. त्यामुळे त्यातल्या काही अंगांना व कळीच्या मुद्यांना स्पर्श करण्याचा प्रयत्न करणार आहे.

मनात विचाराचा जन्म झाल्यानंतर तो पूर्णत्वाला जाण्यासाठी जी काही एक उपासना मोठ्या भाऊंना करावी लागली असेल तिचा विचार प्रथम करू.' उपासना' हा शब्द उच्चारला की काही जाण बिचकतात. कोणतातरी नियम सक्तीने करणे म्हणजे उपासना, असा एक पूर्वग्रह पूर्वसूरींनी निर्माण केलेला आहे. आपल्यापैकी अनेकजण आजही त्याच्याशी घट्ट बांधलेले आहेत. वास्तविक उपासना हे मानवी जीवनाचे अंगभूत तत्व आहे. आपल्या जगण्याचा नि उपासनेचा साक्षात संबंध आहे, म्हणजे माझ्या जगण्यातली उत्कटता नि भव्यता ज्या रूपातून व्यक्त होते, ती माझी उपासना असते. उप म्हणजे जवळ नि आसना म्हणजे धारणा. माझ्या अर्थगर्भ जाणिवांना ज्यामुळे आकार लाभतो, ती उपासना असते. ही उपासना अभ्यासाशी निगडीत आहे. अभ्यास मनात एकदम येत नाही. त्यासाठी चिंतन, मनन, निरीक्षण, ध्यान करावे लागते. त्यातून मनोधारणा पक्की करायची. तिला भक्कम आसन द्यायचे. श्वासातून धारणा मुरण्यासाठी प्राणायाम करायचा. सात्विक आहार घ्यायचा. या सा-यांतून जो नवा अभ्यास निर्माण होईल, तो सर्वांना शुभंकर असतो. मोठ्या भाऊंच्या आयुष्याची सर्व उपासना आणि साधना ही शेतक-यांच्या उन्नती व कल्याणासाठी आसुसलेली होती. त्यामुळेच मूळचे वाणिज्य व कायद्याचे पदवीधर असलेल्या भाऊंनी नव्या नव्या ज्ञानशाखा आत्मसात करून त्यावर संशोधनाने आपल्या विचार व कर्तृत्वाची मोहोर



*श्वासातून धारणा मुरण्यासाठी प्राणायामची साधना*


मातृभूमिनिष्ठा ही श्रेष्ठ उपासना मानून भाऊंनी मातीची कायम जोपासना केली

उमटविली. त्यातून नुसत्या नवीन गोष्टी वा वस्तु मिळाल्या असे नाही, तर त्यामुळे नवा माणूस घडला. काळाला नवे चांगले भान आले. उपासनेतून होणारा अभ्यास माणसाला नवे बनवतो. त्याच्या कर्तृत्वाला क्षितिजांची मंगल तोरणे लावतो हे भाऊंच्या उपासनेतून दृष्टोत्पत्तीस येते

संतांनी उपासनेला दृढ चालवावे असे आवर्जून सांगितले आहे. याचा अर्थ नीट समजून घेतला पाहिजे. उपासनेत पूर्वजांच्या कर्तृत्वाचे संस्मरण हवेच; पण त्यात स्वतःच्या नवीन कर्तृत्वाची भर घालता यायला हवी. ही भर घालणे हे येऱ्यागबाळ्याचे काम नाही. त्यासाठी मनोरथ, आस, व्याकुळता, एकाग्रता आणि गृहपाठ लागतो. जगण्याच्या उत्कट श्रद्धेतून माणसाचा वर्तमान सुफल होतो. हे कळायला देखील मन विचारी व विवेकी लागते. भाऊंची उपासना म्हणजे विवेकनिष्ठ जाणीव. मला उमजलेल्या सत्याच्या वाटांवरले श्रेष्ठ फलित उपासनेत आहे याची यथोचित व परिपूर्ण जाणीव भाऊंना होती. त्यामुळे त्यांच्या उपासनेत कर्तृत्वाचा अहंकार कधीही निर्माण झाला नाही. भाऊंनी केलेल्या काही कामांचे श्रेय अनेकांनी घेतले पण त्याबद्दल त्यांनी कधीही अवाक्षर काढले नाही. मनाने मोठ्या असलेल्या प्रज्ञावंत माणसाचे हे लक्षण आहे. उपासना माणसाला सतत क्रियाशील ठेवते. मुख्यतः नैतिकतेची सद्जाणीव फक्त उपासनाच देऊ शकते. म्हणून भूमीला व निसर्गाला लवून नमस्कार करून उपासना करायची असते हे सूत्र भाऊंनी आयुष्यभर जपले. त्यामुळेच त्यांच्या मनाला सतत उभारी मिळत गेली. अनेक महाकाय संकटातून ते सहीसलामत बाहेर पडले ते उपासनेमुळेच! उपासना सत्कर्मयोगात वय घालवायला लावते. काळ्या आईची व शेतक-यांची इमाने- इतबारे केलेली सेवा हे ही सत्कर्म आहे. मी या मातीतला म्हणून या मातीशी, पर्यायाने या राष्ट्राशी माझे इमान असणे, हीही उपासनाच आहे. किंबहुना मातृभूमिनिष्ठा ही श्रेष्ठ उपासना म्हणून व तसे मानून भाऊंनी कल्पक संशोधनाचा नवा दृष्टीकोन शेतीक्षेत्रात स्वीकारला. सर्वामुखी मंगल बोल उमटवून मातीशी निष्ठा राखण्याची जी अजब कामगिरी त्यांनी केली त्यामुळे शेतक-यांच्या जीवनात आनंदवनभुवन निर्माण झाले. जैनचा पाईप, ठिबक व तुषार संच, ग्रॅन्ड नैन केळीची टिश्युकल्चरची रोपे किंवा मोसंबी, डाळिंब, पपईची रोपे, पांढ-या कांद्याचे बियाणे वापरणा-या कोणत्याही शेतक-याला याबाबत तुम्ही विचारून पाहा. भाऊंच्या उपासनेची सत्यता निश्चितपणे निदर्शनास आल्याशिवाय राहणार नाही. ब-याचदा उपासना आणि साधना हे दोन्ही शब्द एकाच अर्थाने वापरले जातात. पण यांच्यात नीट बारकाईने पाहिले तर सूक्ष्म फरक आहे. साधना प्रकृतीला अनुरूप अशी असू शकते. उपासना प्रकृती अनुकूल व्हायला थोडा वेळ घेते. साधना अभ्यासाचे सातत्य - आणि चिंतनशीलतेचे भान राखते. उपासना उपास्य क्षेत्राचे सर्व उपचार यथास्थित पालन करते. साधनेत सगुण आणि निर्गुण असा फरक नसतो. उपासनेत सगुणाकडून निर्गुणाकडे जाता येते. निर्गुणात उपासना स्थिर झाली, तरी मन अवधूत वृत्ती स्वीकारेलच असे नाही. साधना मुळातूनच अवधूत तत्वाला प्राधान्य देणारी असते. साधना आणि उपासना शेवटी एकाच ठिकाणी येऊन मिळतात. दोन्हीही मनाचे संतुलन राखतात. कोणत्याही प्रसंगावर मात करायला





शिकवतात. साधना अंतरंगाला अधिक प्राधान्य देते. उपासना वृत्तीला व्यापकत्व देते. शारीरिक व्याधी आणि आर्थिक संकटांबरोबरच अनेक समस्यांचा भाऊंनी शेवटच्या श्वासापर्यंत प्रभावीपणे सामना केला तो प्रखर अभ्यास, अनुभव व मजबूत अशा पक्क्या वैचारिक बैठकीद्वारेच. अभ्यास कोणत्याही शाखेचा असो. अभ्यास सापेक्ष आणि निरपेक्ष या दोन्हीही बाजूंनी करायला हवा. अभ्यासाची एक बाजू जशी दिसते, तशी त्याला दुसरी बाजू असते. अभ्यास केल्यानंतर तो जगण्याला पुढे नेतो की नाही, विश्वचैतन्याला अभ्यासून सामोरा जातो की नाही हे भाऊंना फार महत्वाचे वाटे. त्यांच्या भाषणांमधील अनेक अवतरणे (कोटेशन्स) आपण पाहिली तर याचा प्रत्यय येतो.

शास्त्रज्ञांनी लावलेले शोध नक्कीच महत्वाचे आहेत. त्यातून निर्माण झालेली वैज्ञानिक दृष्टी काळाला पुढे नेणारी आहे. परंतु, विज्ञानाचा उपयोग जेंव्हा एक राष्ट्र स्वत:च्या स्वार्थासाठी करते, तेंव्हा विज्ञान कितपत स्विकारायचे ते ठरवावे लागते. राष्ट्रा-राष्ट्रात विज्ञानातील तंत्रज्ञानाच्या रोगट स्पर्धा निर्माण होतात. या स्पर्धेत निरागस जीव नाहीसे होतात. माणसातले चैतन्य मारून टाकले जाते. असे विज्ञान आपण स्विकारून कृतीत उतरावायचे की नाही, हा भवरलालजींनी विचारलेला प्रश्न अभ्यासू मनांना निश्चित विचार करायला लावणारा आहे. राष्ट्रा-राष्ट्रात श्रीमंतीसाठी चढाओढ लागलेली आहे. यात माणसाची सदवृत्ती हरवत आणि हरत चाललेली आहे हा भाऊंच्या बोलण्याचा गाभा, त्यांच्या संशोधनासंबंधीच्या विचारांची दिशा व दृष्टी स्पष्ट करणारा आहे.

संशोधन हे खूप खर्चिक, महागडे, मोठी भांडवली गुंतवणूक करावे लागणारे, प्रचंड इन्फ्रास्ट्रक्चर आणि विद्वान शास्त्रज्ञांचा चमू असल्याशिवाय होत नाही असा आपल्या सर्वांचा निदान आजपर्यंत तरी समज आहे. तो किती खरा, किती खोटा हा भाग



*जैन इरिगेशनने विकसीत केलेल्या बैल चलित कांदा पेरणी यंत्राचे प्रात्यक्षिक घेताना मोठे भाऊ शेजारी अनिल ढाके, एस.व्ही पाटील, सुनील देशपांडे, डॉ. डी.एन. कुलकर्णी व इतर*

जैन हिल्सवरील टिश्यूकल्चर प्रयोगशाळेत निर्निती केल्याजाणाऱ्या टिश्यू रोपांची भवरलाल जैन पाहणी करतांना



निराळा! तो स्वतंत्र अभ्यासाचा विषय आहे. पण पाश्चात देशांमध्ये आज 'इनोव्हेशन' हा जो शब्दप्रयोग केला जातो त्याला टाटा सन्स लिमिटेडचे संचालक असलेल्या आर. गोपालकृष्णन यांनी ''जुगाड' हा शब्द वापरला आहे. त्याचा अर्थ हवे ते बदल करून घेत व्यावहारीक पद्धतीने उपाय शोधून काढणे! 'जुगाड' हा शब्द जरी त्याप्रकारे केल्या गेलेल्या संशोधनाचे काहीसं अवमूल्यन करणारा वाटत असला, तरीही जुगाड पद्धतीचा वापर आज कोट्यावधी भारतीय व्यावसायिकांकडून परिणामकारक उपाय, सेवा किंवा वस्तू तयार करण्यासाठी केला जातोयं आणि देशातला सामाजिक अर्थव्यवस्थेचा प्रश्न सोडवणं अधिक सोपं होत आहे. स्थानिक ठिकाणी उपलब्ध असणाऱ्या साधन सामग्रीचा उपयोग करणं आणि अत्यंत हुशारीनं कल्पक संशोधन करत राहणं, यातून यश तर मिळतंच; पण अनेक प्रकारे जागतिक व्यापारपेठाही त्यामुळे मजबूत होतात. जी व्यक्ती भारतासारख्या विकसनशील देशात यशस्वी होऊ शकते, ती जगभरात कुठेही गेली तरी यशस्वीच होईल. मात्र, भारतात यशस्वी होण्यासाठी जुगाडचा वापर करणं अत्यंत महत्वाचं ठरतं, "असे मत सीमेन्स लिमिटेड - साऊथ एशिया क्लस्टरचे व्यवस्थापकीय संचालक आणि मुख्य कार्यकारी अधिकारी डॉ. आर्मिन ब्रुक यांनी 'जुगाड 'या पुस्तकाला अभिप्राय देताना व्यक्त केले आहे "

श्री. आर. गोपालकृष्णन आणि डॉ. ब्रुक या दोन अनुभवी तज्ज्ञांची संशोधनासंबंधीची मते मी जाणीवपूर्वक वर अशासाठी उद्घृत केली आहेत की, भवरलालजींचे विचार हे थोडे वेगळ्या प्रकारचे होते हे आपल्या लक्षात यावे. कल्पक व नाविन्यपूर्ण संशोधन हे कमी खर्चात व काटकसरीने व्हावे आणि स्थानिक साधनसामग्री वापरून ते होत असेल तर त्याला भाऊंनी नेहमी प्रोत्साहनच दिले. पण याचा अर्थ त्यांनी महागड्या व खर्चिक संशोधनाला विरोध केला असा कुणी लावू नये. आंतरराष्ट्रीय पातळीवर शेतीमाल निर्यातीचे युद्ध जर सक्षमपणे लढून जिंकायचे असेल तर आपण उत्पादित करीत असलेल्या मालाचा दर्जा हा आंतरराष्ट्रीय बाजारपेठेला साजेसाच असला पाहिजे आणि मग त्यासाठी कराव्या लागणाऱ्या संशोधनावर कितीही खर्च झाला तरी तो करण्यास आपण तयार असले पाहिजे आणि त्यासाठी आवश्यक असणाऱ्या सर्व सोयीसुविधा व यंत्रणा आपण



*तुषार संचावर घेतलेले पांढऱ्या कांद्याचे पिक मोठ्या कुतूहलाने पाहताना भवरलाल जैन*

उभारल्याच पाहिजेत यावर भाऊंचा कटाक्ष होता. त्यामुळे पांढऱ्या कांद्यावरची प्रक्रिया असो, आंबा व केळींवर प्रक्रिया करणारा प्रकल्प असो किंवा सौर ऊर्जेचा प्रकल्प असो, भाऊंनी सर्व प्रकारच्या प्रयोगशाळा मोठा खर्च करून आंतरराष्ट्रीय दर्जाच्याच उभारल्या. इतकेच काय पण, नव्याने बायोटेक्नॉलॉजीची जी लॅब उभी केली ती निव्वळ सुसज्जच नाही तर देशातली पहिल्या क्रमांकाची व अत्याधुनिक तंत्रज्ञानाची आहे. दात कोरून पोट भरता येत नाही हे भाऊंनी कृतीतून सिद्ध करून दाखविले. भारतीय शेतकऱ्याचा माल जगाच्या बाजारपेठेत सर्वोत्तम म्हणून सर्वाधिक भावाने विकला गेला पाहिजे अशी आस लागलेले आणि त्यासाठी व्याकुळ झालेले भवरलालजी हे मुळात हाडाचे शेतकरी होते. शेतकऱ्यांच्या कल्याणासाठी व आर्थिक उन्नतीकरीता त्यांचा जीव सतत तळमळत होता. नंतर ते उद्योजक व संशोधक होते. मोठ्या भाऊंनी शेती व शेतकऱ्यांची सेवा हेच आयुष्याचे ब्रीद मानले, ध्येय मानले आणि त्यासाठी ते शेवटपर्यंत चंदनासम झिजत राहीले. त्यांनी केवळ महाराष्ट्र आणि १२६ देशातल्याच शेतकऱ्यांना आधार दिला असे नाही. जगभर आपल्या उद्योगधंद्याचे जाळे उभे करून त्यांनी 'वसुधैव कुटूंबकम' हे कृतीत उतरवून दाखविले. जगभराच्या शेतकऱ्यांना मोलाचा आधार दिला. जगण्याची पृष्ठभूमी म्हणजे आधार. वाटचालीला चैतन्याचा गाभा तेवत ठेवणे म्हणजे आधार. आधारात पांगुळगाडा नसतो. आधारात मदतीचा हातही अपेक्षित नाही. यातले सहाय्य हे निमित्त असते; परंतु ज्याच्या जीवनाची धार आसमंत होऊन कर्तृत्वाची घराणी निर्माण करते, तो खरा आधार असतो. लाखो शेतकऱ्यांना असा आधार भाऊंनी स्थापिलेल्या जैन इरिगेशन कंपनीने दिलेला आहे हे कोणालाही नाकारता येणार नाही आणि विसरताही येणार नाही. माणसाला नेहमीच कुणाचा ना कुणाचा आधार लागतो. आधार नसला तर तो निराधार होतो. माणसाला नेहमी द्वैतात जगणे आवडते. द्वैताला आधार लागतो. आधारातच मन मोठे लागते. ज्याला आधार द्यायचा तो ही मोठा असावा लागतो. मोठा म्हणजे उदार. पृथ्वीला आभाळाचा आधार असतो. काठांना दिशांचा आधार



असतो. तो जाणीवांच्या मन:कोषात असतो. मनाची एक नि:शंक विश्रांतीची जागा म्हणजे आधार. असा आधार मनाला उभारी देतो. धीट करतो. असे आधार महाकाव्य निर्माण करतात. नवा इतिहास घडवितात. त्यातून नवी संस्कृती फुलते. कोणत्याही मोठ्या झालेल्या माणसाच्या आयुष्यात एक अप्रत्यक्ष आधार असतो. ती एक अशी ताकद असते, की त्यामुळे माणूस पक्के परिपक्व पाऊन धाडसाने व धैर्याने पुढे टाकण्यास धजावतो. त्यातून उमटणारे आत्मविश्वासांच्या पाऊलखुणांचे ठसे मागाहून येणाऱ्यांसाठी सोनखुणा बनतात. त्याला ऐश्वर्य पुकारतात. सर्व काही त्याला मिळते. यावल,रावेर, बुऱ्हाणपुर व नंदूरबारचा केळी उत्पादक शेतकरी आणि मालेगाव, सटाणा, सांगोल्यातला डाळींब उत्पादक शेतकरी याचा साक्षीदार आहे.



विज्ञान संशोधन हा मानवी प्रगतीचा आणि त्यामुळे मानवी आयुष्याचा अविभाज्य भाग आहे. त्यातही शेती संशोधन हा आपल्या सर्वांच्या जीवनाशी निगडीत असलेला विषय आहे. कारण चांगलेचुंगले आणि नवीन काही तरी खायला मिळावे अशी प्रत्येकाचीच इच्छा असते. ही इच्छा पूर्ण करण्याचे सामर्थ्य फक्त शेतीत असते. काबाडकष्ट करणाऱ्या शेतकऱ्याच्या मेहनत व प्रतिभेतून जीव्हेचे चोचले पुरविणारे नवनवीन पदार्थ ताटात येत असतात. पण 'अतिपरिचयात् अवज्ञा' या उक्तीनुसार आपल्या ते लक्षात देखील येत नाही! अगदी साधे उदाहरण देतो, आपण सगळेजण अनेक वर्षांपासून काळे डाग पडलेली चिकटी केळी खात होतो. मागील २५ वर्षांपासून गर्द सोनेरी पिवळी, एकही काळा डाग नसलेली, लांबलचक व मोठी गोलाई असलेली, खालून बुडाला काळी, वरून देठाला हिरवी असलेली 'ग्रँडनैन' जातीची केळी खाणे आपण अधिक पसंत करतो आहोत. किंबहुना याच 'ग्रँडनैन' केळींनी आज भारताची संपूर्ण केळी बाजारपेठ ताब्यात घेतली आहे. या केळींचा भारतात जर कुणामुळे विकास झाला असेल तर त्याचे श्रेय भवरलाल जैन यांना व त्यांच्या दूरदृष्टीला आहे. त्यांनी मध्य अमेरिकेतून 'ग्रँडनैन' ही जात जळगावात आणून टिश्यूकल्चर पद्धतीने दरवर्षी दर्जेदार व गुणवत्तापूर्ण कोट्यावधी रोपे बनवून ती नुसत्या खान्देशातल्याच नव्हे तर



*ग्रॅन्ड नैन केळीची टिश्यूकल्चर पद्धतीने तयार केलेली रोपे पाहताना डॉ.एपीजे अब्दुल कलाम. रोपांची माहिती देताना अजित जैन, गाडीत पाठीमागे डॉ.भवरलाल जैन व डॉ.अनिल काकोडकर*

# मरणात खरोखर जग जगते !



मानवाची प्रगती ही नेहमीच काही मोजक्या द्रष्ट्या आणि असामान्य लोकोत्तर व्यक्तींच्या कर्तबगारीवर होत असते. जन्म आणि मृत्यू हे निसर्गाचे नियम आहेत. त्यातून कुणीही सुटला नाही किंवा सुटणारही नाही. हे जरी खरे असले तरी भवरलाल भाऊंसारख्या प्रभावी व्यक्तीमत्वांमुळे व सर्जनशील उद्योजकांमुळे जीवनाला एक वेगळाच अर्थ प्राप्त होतो आणि मृत्यूलाही एक वेगळा अर्थ प्राप्त होतो. कवीवर्य भा.रा.तांबे यांनी किती मार्मिक शब्दात लिहिलयं... ***मरणात खरोखर जग जगते!***

जीवन हे जगण्यासाठी असते. आनंद मिळविण्यासाठी असते. ह्या साध्या पण चिरंतन सत्याचे भाऊ उपासक होते. उद्योग चालवित असताना संशोधन, वाचन, शिल्पकला, चित्रकला, साहित्यनिर्मिती, भाषणे, मित्र आणि निसर्गाशी संवाद किती म्हणून विषयांचा अभ्यास करीत जोपासलेल्या छंदांनी त्यांचे जीवन त्यांनी स्वत:च आनंददायी करून सोडले होते. भाऊंना जसे जीवन समजले होते, तसेच संशोधनतीर्थात सतत विहारणाऱ्या भवरलालजी या विज्ञानयात्रीलाही जीवनाचे रहस्य समजले होते. त्यामुळे विज्ञानाची धरलेली कास त्यांनी अखेरपर्यंत सोडली नाही. विज्ञानाने माणूस उत्क्रांत होत गेला, हे सिद्ध केले. तरीही एक महत्वाचा प्रश्न विज्ञानाला सोडवता आलेला नाही. तो म्हणजे, आत्मा कशा प्रकारे राहतो? देहातील चैतन्य कशा रीतीने खेळते? हे शरीर कोण तयार करतो? या शरीराला कोणती शक्ती आकारित करते? जड परमाणूंचा संयोग कसा होतो? जगण्याला कोणकोणत्या बाबी आवश्यक ठरतात? विचाराने जगणे महत्वाचे असते काय? मृत्युनंतर माणसाचे काय होते? आणि हे जग खरे आहे का ? हे प्रश्न माणसाला सतावतात. कठोपनिषदाचा आरंभ या प्रश्नांनी होतो. मृत्युनंतर माणूस कायमचा नाहीसा होतो तर दुसरे एक मत आहे, तो नाहीसा होत नाही. तो अस्तित्वात असतो. यातून माणसाने विचार करायला सुरूवात केली. मृत्यु हा नेमका कशात असतो? सारे जग एका क्षणात नाहीसे होते. मनाची स्थिती त्यावेळेला वेगळीच असते. तरीही माणसाला सुखाची परम इच्छा असते. सुखाच्या लालसेने तो भोगांच्या मागे धावत असतो. कधीकधी त्याचे भाग्य त्याच्याशी लपंडाव खेळते. त्या खेळात लहानपण संपते. तारूण्य गमावते. वृद्धपणी चिंता संपते. नंतर कळते, सारे काही क्षणभंगूर आहे. या साऱ्यातून सुटण्याचा महत्वाचा मार्ग म्हणजे हे सारे जग जाणून घेणे. मानवजातीच्या इतिहासात याचा शोध सतत सुरू आहे. कोणीही यातून सुटलेला नाही.

देशभरच्या शेतकऱ्यांना पुरविली. त्यामुळे नुसत्या दर्जेदार केळींचे उत्पादन सुरू झाले असे नाही तर खान्देशातून केळींची जगाच्या बाजारपेठात निर्यात सुरू झाली. खान्देशातल्या माझ्या शेतकऱ्याने पिकविलेल्या मालाने परदेशी बाजारपेठ पाहून तिथल्या ग्राहकांची आवडनिवड पूर्ण करावी ही मोठ्या भाऊंची आस व स्वप्न पूर्ण झाले.

आस म्हणजे इच्छा. आस या शब्दाचा हा कोषातला अर्थ झाला. इच्छा वरवरची असते; पण इच्छेतून जाणिवेची जी खोली निर्माण होते, त्याला आस म्हणतात. या खोलीने भाऊंच्या तळमळीला संशोधनाचे अंगण दिले. नवीन व्हरायटींची पहाट दाखविली. ही पहाट जैन इरिगेशन कंपनीने शेतकऱ्यांच्या घराघरात पोहचविली. पहाटेच्या सोनेरी किरणांनी घराचा दरवाचा किलकिला होताच तिरप्या फटीतून आत शिरावे आणि लख्ख प्रकाश घरभर पसरावा तशी स्थिती 'ग्रँडनैन' या व्हरायटीने निर्माण केली. शेतकऱ्यांनी मेहनतीने ही व्हरायटी वाढवून जगाची नजर लागावी अशा रितीने उत्पादनाचे आभाळ निर्माण केले. त्यातून त्याच्या आर्थिक प्रगतीचा आलेख प्रचंड झेपावला. या सर्व बदलामागे आणि प्रगतीच्या मुळाशी मोठ्या भाऊंच्या स्वप्न व दूरदृष्टीची आणि विचारांची आस होती. आस हा शब्द दिसायला किती छोटासा आहे. पण त्यात भरलेला अर्थ पंचमहाभूते व्यापणारा आहे. आस मनाच्या चिंतनगर्भ जाणिवेतून प्रकटते. आस आणि इच्छा यात महदंतर आहे. वासनांच्या गरजांतून इच्छा जन्मते. ती वरवरची, तात्कालिक असते. तो तात्पुरता उतारा असतो. आस असामान्य असते. ती जगण्याच्या कायमपणाला बळ देते. ती मनाच्या कुपीत राहते. इथे सामान्य-असामान्य यातला फरक कळतो. आस ही अखंड चालणारी प्रक्रिया आहे. अलौकिक महापुरूष ती प्राणापलिकडे जपतात. भाऊंची आस अगदी तशीच होती. त्यामुळे जगाच्या कल्याणाकरीता ती सतत धडपडली. पांढऱ्या कांद्यावरची प्रक्रिया असो किंवा केळी निर्यात व त्यावरील प्रक्रिया असो. सुरूवातीला नुकसानच झाले. कर्जाचा डोंगर उभा राहिला. सुखातला जीव दु:खात गेला. पण शेतकऱ्याच्या जीवनात नवचैतन्याची पहाट फुलविण्यासाठी हे करणेच मला भाग आहे या निर्धाराने भाऊंनी संकटांशी दोन हात केले. त्यांच्या या जनकल्याणासाठीच्या आसेतून निर्माण झालेल्या दृष्टीने शेतकऱ्यांना पसायदान दिले. जनमानसाला लब्धप्रतिष्ठा दिली. भौतिक श्रीमंती तर दिलीच दिली पण चिरंजीवपद दिले. त्यामुळे भाऊंची आस वैश्विक ठरली. या आसेत केवळ देणे-घेणे नसते. अलौकिकांच्या आसेत जीवनमूल्य असते. यातून जगण्याचा संस्कार लाभतो. हेव्यादाव्यांच्या पलिकडे माणूस जातो. याला देवपण म्हणतात. तो सगळ्यांच्या उपयोगी पडतो. सर्वांना आपलेसे करतो. आसेचे




*तामिळनाडू कृषी विद्यापीठाची सन्माननीय डीएस्स.सी. ही पदवी भवरलाल जैन यांना प्रदान करताना तत्कालिन राज्यपाल व कुलपती सुरजीतसिंग बर्नाला शेजारी कुलगुरू सी. रामासामी*




सामर्थ्य आणि गहनता काय असते याचा प्रत्यय येथे येतो. इथे विकारांना थारा नसतो. अशी आस तप करायला लावते. तपात निष्कामता आणते. दृष्टीला गुरूकृपेचा प्रसाद मिळतो. यातून नवा माणूस घडतो. टिश्यूकल्चरच्या एका रोपातून नवा माणूस घडविण्याचे जे सामर्थ्य भाऊंच्या आसेने दाखविले तिला जगात तोड नाही. म्हणूनच ही आस अद्वितीय, अतुलनीय, अवर्णनीय, शब्दातीत आणि नोबेलच्याही पलिकडची ठरते.

शेती आणि शेतकऱ्यांच्या जीवनात परिवर्तन घडवून आणत असताना तो बदल शाश्वत स्वरूपाचा कसा राहील या विचाराने घेरल्यानंतर जैव तंत्रज्ञान शाखेत (बायोटेक्नॉलॉजी) याचे उत्तर दडलेले आहे हे लक्षात आल्यावर भाऊंनी या तंत्रज्ञानाच्या अभ्यासाची कास धरली. जगभरातून या विषयावरची पुस्तके आणली. जिथून जे मिळेल ते साहित्य गोळा केले. त्यांची या विषयाचे ज्ञान मिळविण्याची जिज्ञासाच इतकी प्रचंड होती की, ते झपाटल्यासारखे काम करीत होते. जगभरच्या जैव तंत्रज्ञानाच्या प्रयोगशाळा पाहात होते. शास्त्रज्ञांशी संवाद करीत होते. या शास्त्राचे अंगभूत सामर्थ्य काय ते समजून घेत होते. जगातली अद्ययावत जैव तंत्रज्ञान प्रयोगशाळा त्यांना जळगावात उभी करायची होती. या अभ्यासात त्यांचा डी.एन.ए. (डिऑक्सिरायबोन्यूक्लिक आम्ल) चा रहस्यभेद करणाऱ्या डॉ. फ्रँसिस हॅरी कॉम्प्टन क्रिक यांच्या जीवशास्त्र व कार्बनी रसायन शास्त्रातील संशोधन साहित्याशी परिचय झाला. प्रथिनांच्या स्फटिकांच्या अभ्यासासाठी क्ष-किरण विचलन पद्धती (X-ray diffraction) डॉ. क्रिक यांनी शिकून आत्मसात केली होती. जैविक रेणूंमध्ये नेमका कसा आणि कधी जीव निर्माण होतो? आणि मेंदू व सदसदविवेकबुद्धी किंवा सारासार




*राजस्थानातील उदयपूर कृषि विद्यापीठाची सन्माननीय डीएस्स.सी. ही पदवी भवरलाल जैन यांना प्रदाना करताना राजस्थानच्या राज्यपाल व कुलपती महामहीम सौ. प्रतिभाताई पाटील*




# उद्योगपती, ज्ञानव्रती हा दुर्मिळ योग !

सृष्टीतील जीवनव्यवहार समजून घेण्यासाठी विज्ञानाची कास धरली पाहिजे. त्यासाठी संशोधनही अखंडपणे चालू ठेवले पाहिजे. पण विज्ञान हेच एकमेव सत्य आहे असे मानून तथाकथित वैज्ञानिक प्रगतीने माणसाच्या प्रगतीचा आलेख काढणे हे योग्य नाही. विज्ञान आणि अध्यात्म हातात हात घालूनच गेले पाहिजे अशा प्रकारची विचारधारा भाऊंची होती आणि ती त्यांनी कधी लपविली नाही, प्रख्यात वैज्ञानिक अल्बर्ट आईनस्टाईन यांच्या "आत्मज्ञानविषयक विचार मनाने घेणे महत्वाचे असते. त्याशिवाय आध्यात्मिक दृष्टीकोन निर्माण होत नाही. केवळ विज्ञान हे आत्मज्ञानाशिवाय लंगडे आहे. आत्मज्ञानाचा विचार लक्षात घेण्यासाठी मन जितके आवश्यक आहे, तितके आत्मज्ञान गरजेचे आहे.", या विचारांवर भाऊंची श्रद्धा होती. ते म्हणत, मनाने अध्यात्म आणि विज्ञान या दोन्हीही बाबी समजून घ्यायला हव्यात, मानवी जीवनाचे हे दोन्ही हात आहेत. हे दोन्हीही उपयुक्त आहेत. आज वेदात, उपनिषदात, संत साहित्यात मांडलेले वैज्ञानिक विचार आवर्जून चर्चिले जात आहेत. विज्ञान युगात माणूस चंद्रावर पोहोचला. आता तो मंगळावर वसाहत करण्याच्या तयारीत आहे. यामुळे समाज सुखी झाला आहे काय ? आज असे दिसते की, भौतिक सुविधा जितक्या जास्त तितकी माणसाची भूक वाढतीच आहे. तो कधी समाधानी होणार? ही विज्ञाननिष्ठा नाही, विज्ञाननिष्ठा म्हणजे मानवी जिज्ञासेला शास्त्रीय बैठकीची वस्तुनिष्ठ अभ्यासाची बैठक देणे होय. कुतूहलातून मानवी कल्याणासाठी घेतलेले विधायक शोध म्हणजे विज्ञान. शोधातून पुन्हा नव्याने शोध घेणे आणि त्यांची योग्यायोग्यता पडताळून पाहणे महत्वाचे असते. मानवी जगणे सुकर होण्यासाठी विज्ञान नक्कीच गरजेचे आहे. परंतु त्यातून संकुचित अहंता निर्माण होण्याची शक्यता असते. कर्तृत्वाविषयीचा अभिमान निर्माण होतो. कर्मफलाची आशा न बाळगता मोकळे कसे व्हायचे हे विज्ञानापेक्षा ज्ञान अधिक चांगले समजावून सांगू शकते. माणसासाठी उन्नतीकारक ज्ञान महत्वाचे आहे. ज्या ज्ञानाने जीवनाचाच विकास होते, ते ज्ञान मिळविणे यासारखी दुसरी महत्वाची गोष्ट नाही. ज्ञानावर अशी प्रचंड श्रद्धा असल्याने भाऊ शेवटपर्यंत ज्ञानव्रतीच राहिले उद्योजक ज्ञानव्रती राहावा हा दुर्मिळ योग आहे.



विचार करणारे मन यातील परस्परसंबंध कसा असेल? याचा विचार डॉ. क्रिक तेव्हा करते होते. पेशींमधील जनुकांमध्ये अनुवंशिक माहिती साठवून ठेवण्यासाठी त्याच्या रचनेत कोव्हॅलंट बंध मोलाची कामगिरी बजावतात हा सिद्धांत त्यावेळी सर्वांनी स्विकारला होता. कोणत्या रेणूमध्ये ही अनुवंशिक माहिती आहे एवढेच सिद्ध करणे बाकी होते. डॉ. क्रिक यांच्या मते चार्लस् डार्विन यांच्या उत्क्रांतीचा सिद्धांत, ग्रेगर मेंडेलचे अनुवंशिकशास्त्र आणि अनुवंशिकतेचे रेण्वीय स्वरूप या तिन्हींचा एकत्रित परिणाम म्हणजे जीवनरहस्य! त्यांना अशी खात्री वाटत होती की, या ज्ञानाचा वापर करून प्रयोगशाळेतील परीक्षानलिकेत जीव निर्माण करता येऊ शकेल. परंतु त्यांच्या हयातीत ही गोष्ट सिद्ध होऊ शकली नाही. पण स्वप्ने पाहिली तरच त्यातील काही स्वप्ने खरी होण्याची शक्यता असते. डॉ. क्रिक आणि भवरलालजी जैन यांच्यात इथे एक साम्य आहे ते म्हणजे, आंब्याचे टिश्यूकल्चर पद्धतीने रोप तयार करण्यासाठी भाऊ सतत १५ वर्ष प्रयत्न करीत होते. खालचे रूट आणि वरचे सायन यावर अखंड संशोधन चालू होते. पण भाऊंच्या हयातीत हे संशोधन पूर्ण झाले नाही आणि यशस्वीही झाले नाही. त्यांच्या निधनानंतर मात्र ४ वर्षांनी हे संशोधन यशस्वी होऊन त्या आंब्याच्या झाडाला २०२०-२०२१ मध्ये फळे लागली. जगात आंब्याचे टिश्यूकल्चर अजून कुणालाही जमले नाही. ते जळगावात राहून भाऊंनी यशस्वी करून दाखविले. या यशस्वीतेमागे त्यांचे किती प्रयत्न, ध्यास, व्याकुळता आणि जिज्ञासा असेल याची आपण कल्पनाही करू शकत नाही. ध्येयवेडे झाल्याशिवाय असे यश मिळू शकत नाही.

एखाद्या गोष्टीचा ध्यास लागला, की तो मनात मुरतो. या मुरण्याची तीव्रतम धारणा जेव्हा शिगेला पोहचते, त्याला व्याकुळ



*१२ डिसेंबर २०१५ रोजी मोठ्याभाऊंच्या हस्ते लावण्यात आलेल्या टिश्यूकल्चर आंब्याच्या झाडाला २०१९ मध्ये प्रथम आंबे लागले. टिश्यूकल्चर पद्धतीने यशस्वी झालेले आंब्याचे जगातील पहिले झाड आहे.*



जळगावच्या जैन हिल्सवर एप्रिल २००६ मध्ये भारतात पहिल्यांदा अतिसघन पद्धतीने लागवड केलेल्या आंब्याच्या झाडाला ठिबक संचाद्वारे पाणी दिल्यानंतर लगडलेली मोठी फळे दाखवितांना भाऊ. भारतातील या अतिसघन लागवड पद्धतीचे भाऊ प्रवर्तक आहेत.

म्हणतात. व्याकुळता केवळ तळमळण्यात वा तडफडण्यात नसते. चांगल्या ध्यासाविषयीची आंतरिक घनओढ म्हणजे व्याकुळता. कुठल्याही नव्या आसाच्या आभाळाला विशाल अंगण देणे हे व्याकुळतेत येते. त्यासाठी आधी संवेदना असावी लागते. ही संवेदना थिल्लर व तात्कालिक बनता कामा नये. ती ध्येयपूर्ती किंवा अंतिम उद्दिष्ट गाठेपर्यंत टिकली पाहिजे. संवेदनेला मनाचे संतुलन प्राप्त झाले, की व्याकुळता निर्माण होते. सुव्रतासाठीचा ध्यास अशा व्याकुळतेतून जन्माला येतो आणि वाढीलाही लागतो. व्याकुळता नि:स्वार्थीपणाहून अधिक नितळ असते. सृजनाच्या मुळाशी व्याकुळता आहे. म्हणून निसर्ग अधिक सुंदर आहे. शास्त्रज्ञ प्रयोगशाळेत संशोधन करताना जीवाचे पाणी पाणी करतो. हीही व्याकुळताच असते. त्यातून मोठमोठी कामे होतात. तेव्हा मोठमोठी नावे दिसतात. भवरीलालचे नाव एका रात्रीत पद्मश्री डॉ. भवरलाल जैन असे होत नाही. त्यामागे प्रचंड मेहनत, कष्ट व तपश्चर्या असते. या मोठेपणासाठी त्यांनी जी व्याकुळतेची किंमत दिलेली असते तिचे शब्दांत कसे वर्णन करणार? ते त्यांच्या व्याकुळतेचे तप असते. आपल्याला मान-सन्मान दिसतात, पण त्यासाठी त्यांनी जे सोसलेले असते ते त्यांनाच माहित असते. व्याकुळतेसाठी मनाची तयारी लागते. कर म्हणून सांगावे लागत नाही. ते आपले देणे असते. ते आपणच द्यायचे-घ्यायचे असते नि यातून सहज मोठे होऊन इतरांना मोठे करायचे असते. बायोटेक्नॉलॉजीची लॅब उभारताना हाच निदिध्यास भाऊंच्या व्याकुळतेने जपला.

डी.एन.ए. आणि आर.एन.ए. (डीऑक्सिरिबोन्यूक्लिक आम्ल आणि रिबोन्यूक्लिक आम्ल) ही दोन रेणू जनुकीय प्रणालीचा अतिशय महत्वाचा भाग आहेत. डॉ. जेम्स वॉटसन, डॉ. ल्यूरीया, डॉ. जेन कन्ड्र्यू, डॉ. मॉरिस विल्किन्स, रोझलिंडा फ्रँकलिन, डॉ. क्रिक, सर लॉरेन्स ब्रॅग व अन्य शास्त्रज्ञांनी जनुकीय तंत्रज्ञानासंबंधी जो अभ्यास व संशोधन केले होते ते आपल्याला शेतीच्या क्षेत्रात कसे वापरता येईल याचा ध्यास घेऊन भाऊंनी इतरांपेक्षा वेगळा व चांगला असा जीन (क्लोन) ग्रँडनैन केळीच्या कंदातून शोधला व त्याचे टिश्यूकल्चर तंत्रज्ञानाद्वारे रोप बनविले. संशोधन आणि जिज्ञासा यांचा फार जवळचा संबंध आहे. जिज्ञासा हा मानवाचा न मावणारा अवकाश आहे. कधीही न संपणारी ती तितिक्षायुक्त वाटचाल आहे. जिज्ञासेत कुतूहल आहे. काही कुतूहल तात्पुरती नि वरवरची असतात. परंतु काही कुतूहलांना अभ्यासपूर्ण खोली लागते. आजन्म चिंतनात राहून समाजाला अमरत्वाचा नवा प्रकाश देण्याची जी



# निसर्गावर भाऊंचे जीवापाड प्रेम !

भाऊंनी निसर्गावर भरभरून प्रेम केले. त्याला आपले पालक मानले. निसर्ग जसा असेल तसे आपण राहायला शिकले पाहिजे असे आवर्जून सांगितले. माणसाच्या वृत्ती निसर्गातून घडतात. माणूस निसर्गाशी हिंसक वागला तर निसर्ग कुरूप होतो. पण तो जर समजून वागला तर निसर्ग सुंदर होतो. प्राणी, पक्षी निसर्गाला जपतात. सृष्टीतला कोणताही जीव (माणूस सोडल्यास) निसर्गाच्या विरुद्ध जात नाही, वागत नाही. माणूस हा एकमेव असा महाप्राणी आहे जो स्वत:च्या सुखाच्या अतिरेकापायी निसर्गावर अन्याय करतो. मोठमोठ्या अरण्यांना उध्वस्त करून, पाण्याचे साठे प्रदूषित करून पर्यावरणाचा नाश करतो. निसर्गाला संपविणे म्हणजे मानवजातीला संपविणे हे भवरलालजींना पक्के ठाऊक असल्यामुळे त्यांनी आपले सर्व उद्योगधंदे पर्यावरणाला पोषक होतील आणि त्याची कदापीही हानी करणार नाहीत याच पद्धतीनेउभारले. इतकेच नव्हे तर मेहनत व कल्पकता वापरून आणि मोठा खर्च करून त्यांनी जळगावातील जैन हिल्सवर स्वत:चा निसर्ग उभा केला. पर्यावरणात जे नैसर्गिक बदल होतात ते बारकाईने अभ्यासून तशी व्यवस्था प्रत्येक कारखान्याच्या ठिकाणी उभी केली. निसर्ग ओरबडून व पर्यावरण उध्वस्त करून आपण जो विकास करतो आहे तो तात्कालिक असेल. तो चिरंतर टिकणार नाही. शाश्वत व कायम राहणार नाही, म्हणून डोळ्यांत तेल घालून बारकाईने पर्यावरणाचे रक्षण केले पाहिजे. फांद्यांसह फुले, फळे एकाच वेळी हस्तगत व्हावी असे वाटत असेल तर मुळापर्यंत जावे लागते. मुळाचा आणि मातीचा सर्जनशील संबंध लक्षात घ्यावा लागतो. सृष्टीचे मूळ सांभाळले, की आपली मुळे सतेज राहतात. हे अचूक ओळखलेल्या भवरलालजींनी निसर्गाशी कायम मैत्री करून त्याच्यावर जीवापार प्रेम केले.



शक्ती आहे, तिला जिज्ञासा म्हणतात. जाणण्याची इच्छा जशी जिज्ञासेत आहे, तशी इच्छेच्या निरीक्षणाची व्यापकताही त्यात आहे. कुतूहलाचे मन:पूत चिंतन म्हणजे जिज्ञासा. उत्सुकतेला व्यापक परिमाण देणे म्हणजे जिज्ञासा.

भाऊंची जिज्ञासा उत्कट आणि चिंतनाने भारलेली व समाजोन्नतीसाठी उसळणारी होती. त्यामुळे तिला विश्रांतीच नव्हती. ती सतत मधमाशी सारखी ज्ञानाचे अमृतकण गोळा करीत होती. उपनिषदात पहिली आज्ञा आहे, 'अथ तो ब्रम्हजिज्ञासा'. जाणून घ्यायची मनापासून तयारी असेल तर कोणताही विषय अवघड नाही. मनातली जिज्ञासा एकदा जागृत झाली, की माणूस अभ्यासात रमतो. कोणताही विषय त्याला वर्ज्य राहात नाही. त्याला अभ्यासात आनंद मिळतो. आपल्या भोवतालच्या जगण्याचा तो अर्थ लावतो. जिज्ञासा जितकी तीव्र नि उत्कट, तितके संशोधन मुलभूत ठरते. भाऊंची जिज्ञासा अगदी तशीच होती. त्यामुळेच संशोधनाच्या विविध क्षेत्रात ते रमले. त्यातून त्याना अभ्यासाची नवनवी क्षेत्रे गवसली. नव्या जाणिवा जन्मल्या. त्यांनीही आणखी जिज्ञासा वाढविली. त्यामुळे वय, आजार, दुखणे विसरून ते अखंड संशोधनात व्यस्त राहिले. पहाटे पाचला उठल्यापासून फिरायला जाताना झाडे, पानाफुलांशी ते जो संवाद करायचे त्यात संवेदना आणि संशोधन दोन्हीही ओतप्रोत भरलेले होते. रात्री झोपेपर्यंत हा संवाद चालत असे. जिज्ञासेचे वर्म आणि मर्म त्यांनी अचूक ओळखले होते. त्यामुळेच त्यांनी तिला जीवनात महत्वाचे स्थान दिले होते. जिज्ञासा ही शोधाची जननी आहे, हे भाऊंना पक्के ठाऊक होते. ही जिज्ञासा साऱ्यांमध्ये असते. पण काही जणांनाच तिची जाणिवपूर्वक जोपासना करता येते. काही जिज्ञासेवर आळशीपणाचे पांघरून घालतात. बघू नंतर असे म्हणून तिला दूर लोटतात. जिज्ञासा सतत फुलती व खेळती ठेवण्यासाठी वृत्ती आनंदी हवी. जिज्ञासा सतत जागी ठेवण्यासाठी वृत्ती समाधानी हवी. जिज्ञासेला अधिक वेळ दिला की, संशोधनाला मोठे खुले अंगण मिळते. आपण जे काही करणार आहोत त्यालाही मार्ग सापडतो. जिज्ञासेने जीवाचे मैत्र केले, की माणूस गुणांनी वाढतो. जिज्ञासा सन्मार्गाच्या रस्त्याने जाणारी असेल तर ती इतरांच्याही जिज्ञासा वाढविते. त्यामुळे स्वत:च्या पायावर उभे राहता येते. कृतीचा आणि उक्तीचा पुल म्हणजे जिज्ञासा

## मेहनतीलाच भाऊंची शाब्बासकी

मेंदूला विचार करण्याची सवय लावता आली पाहिजे. सर्वांचा मेंदू सारखाच तेज असेल असे नसले तरी त्याला विचार करायला लावून विचारी बनविणे आपल्या हाती असते यावर मोठ्या भाऊंची गाढ श्रद्धा होती. त्यामुळे कुठलाच सहकारी वा कर्मचारी त्यांनी कधीही कुचकामी, टाकावू समजला नाही. परमेश्वराने प्रत्येक माणसाला काही ना काही उपजत बुद्धी व कला दिलेली आहे. तिचा पुरेपूर वापर करून घेण्याच्या दृष्टीने आपण प्रयत्न केला पाहिजे ही खूणगाठ मनाशी बांधून भाऊंनी त्यांच्या सहवासात येणाऱ्या प्रत्येकाची गुणवैशिष्ट्ये, ताकद व मर्यादा आणि आवडनिवड व वेगळेपण समजावून घेऊन त्याच्यातल्या कलागुणांना कसा वाव मिळेल याकडे सातत्याने व नियमितपणे लक्ष दिले. त्यामुळे अनेक सामान्य माणसांकडूनही त्यांनी खूप मोठमोठी कामे करून घेतली. हुशार, बुद्धिमान, तरूण व होतकरू आणि कल्पक, अभ्यासू संशोधकांना त्यांनी कायम प्रोत्साहन देऊन नवनवीन संधी उपलब्ध करून दिल्या. त्यांना उच्च शिक्षणासाठी मदत तर केलीच, प्रसंगी परदेशातही प्रशिक्षणासाठी पाठविले. भाऊंच्या म्हणण्यानुसार जी व्यक्ती आपला गृहपाठ नीट अभ्यास करून पूर्ण करते, त्या व्यक्तीकडे प्रज्ञावंत बनण्याची क्षमता असते. त्यांच्या मते कष्ट करण्याची अमर्याद ताकद, सामान्यज्ञान व सातत्यपूर्ण प्रयत्न या तीन बाबी जर तुम्ही अंगीकारल्या तर नवनवीन शोध लागणे व लावणे हा जणू काही दैनंदिन जीवनक्रम होतो. देशातली नवीन पिढी आपल्याला निर्मितीक्षम बनवायची आहे. कोणत्याही नवनिर्मितीमध्ये अंत:स्फूर्तीचा वाटा छोटा असतो व मेहनतीचा वाटा मोठा असतो यावर नितांत विश्वास असणाऱ्या भाऊंनी मेहनतीलाच परमेश्वर मानून त्यासाठी तरूणांना प्रचंड प्रोत्साहन दिले व शाब्बासकीही दिली.





माती विरहीत माध्यामात एरोपोनिक तत्रज्ञानाने निर्मित रोगमुक्त एअर आलू बटाट्याचे बियाणे

होय. या पुलाचा उत्तम संगम मोठ्या भाऊंच्या जीवनात आपल्याला पाहायला मिळतो. त्यामुळे त्यांच्या जिज्ञासेचे कौतुक तरी किती करावे असे सतत वाटत राहते.

हायड्रोपोनिक्स व एरोपोनिक्स पद्धतीने बटाटे वाढविताना, बटाट्याचे ब्रिडींग करताना चांगल्यात चांगला म्हणजे सुपिरिअर जीन भाऊंनी शोधून काढला. प्रक्रियेसाठी वापरल्या जाणाऱ्या पांढऱ्या कांद्याचा टी.एस.एस. (एकूण साररूप घनभाग) जास्तीचा राहावा त्यातले पाण्याचे प्रमाण कमी असावे, कांद्याचा आकार मोठा व्हावा यासाठी त्यांनी तसे जीन शोधले. जनुकीय बदल ही नैसर्गिक प्रक्रियेत घडणारी गोष्ट आहे. एका रात्रीत एका वर्षात आपल्याला पाहिजे तसा १०० टक्के जनुकीय बदल घडत नाही. त्यासाठी किमान चार-पाच वर्षे जावी लागतात. उत्पादन व उत्पादकता वाढविणे, गुणवत्ता व टिकण्याचा कालावधी वाढविणे, रोग व किड प्रतिबंध शक्ती त्या वाणात निर्माण करणे, पोषणमूल्ये वाढविणे, प्रक्रियेसाठी तो वाण अनुकूल करणे, पाण्याचा ताण सहन करण्याची क्षमता त्याच्यात निर्माण करणे असे निरनिराळे घटक लक्षात घेऊन त्या पद्धतीने तंत्रज्ञानाचा वापर करावा लागतो. तसे वळण पिकाला द्यावे लागते. संशोधनाचा कार्यक्रम सगळे बारकावे लक्षात घेऊन जेव्हा राबविला जातो तेव्हाच ते उपयुक्त ठरते. संशोधनाची उपयुक्तता शेवटी शेतकऱ्याच्या हातात कसल्या प्रकारचे बियाणे व रोपटे देता त्याच्या गुणवत्तेवर अवलंबून असते. या गुणवत्तेचा महिमा गाण्यासाठी प्रचार-प्रसाराचे आणि जाहिरातीचे तंत्र अजिबात वापरण्याची आवश्यकता नसते. गुणवत्ता श्रेष्ठ असेल तर तिचा महिमा एखाद्या फुलाच्या सुगंधासारखा वाऱ्याच्या लहरीप्रमाणे पसरतो. शेतकरी स्वत: हून त्या बियाण्यासाठी, रोपांसाठी रांगा लावतात. आगाऊ पैसे भरून नोंदणी करतात. याचा अनुभव जैन इरिगेशन कंपनी केळी, डाळींब, पपई, आवळा यांची रोपे किंवा पांढऱ्या कांद्याचे बियाणे यांच्या बाबतीत घेत आहे.



माल उत्पादित करताना भाऊंनी गुणवत्तेच्या बाबतीत कधीच तडजोड केली नाही. मला नफा थोडा कमी मिळाला तरी चालेल, अधिक माल विकून मी खर्चाची तोंडमिळवणी करीन हे सुत्र समोर ठेवून संशोधन व उत्पादनाचा कार्यक्रम त्यांनी



राबविला. त्यामुळे जैन कंपनीच्या मालाचा 'दर्जेदार व गुणवत्तापूर्ण' असा महिमा तयार झाला. हा महिमा आता पुढल्या वाटांचा सोबती आहे. महिमा कुणाचा गावा, असा प्रश्न धर्मराजाला यक्षाने विचारला. तेव्हा धर्मराजाने समर्पक उत्तर दिले, "आत्मज्ञानाचा". व्यक्तीच्या महिम्याला विषयाच्या, विकाराच्या, देहाच्या मर्यादा असतात. आत्मज्ञानाच्या महिम्याला अमर्यादपण असते. आत्मज्ञानाच्या विकसित जाणिवेमुळे नव्या सहस्त्रकात माणूस विचारशील म्हणून जगू शकतो. आत्मज्ञान म्हणजे, स्वत:ला स्वत:ची यथार्थ ओळख पटणे. आत्मज्ञान म्हणजे, आत्माच्या यथार्थतेचे भान. आत्मज्ञान म्हणजे, जगण्याच्या प्रत्ययाचा साक्षात भाग. हे समजले, की नुसता वर्तमान जिंकला असे नाही तर तुम्ही विश्वाला जिंकले. जो विश्व जिंकतो तोच 'हे विश्वचि माझे घर' असे म्हणण्याचे धाडस करू शकतो. भाऊ, असे म्हणण्याचा अधिकार तुम्हांला निश्चित आहे. म्हणून या वाढदिवसाच्या निमित्ताने आम्ही तुमचा महिमा गातो. तो महिमा आम्हांला जगायला, नवे काम करण्याला बळ देतो. महिमा अशांचा गावा, जे परिस्थितीला सामोरे जायला सामर्थ्य देतात. महिम्यात असे विसावावे, की ज्यामुळे आपल्या जीवाचे मैत्र सांभाळण्याची शक्ती मिळते. आज विचार, ज्ञान, विज्ञान, आत्मज्ञान यांचा महिमा नव्या पिढीपुढे ठेवला पाहिजे. उद्याच्या आशेचा सूर यात सापडणार आहे. तेव्हा आत्ताच काय ते ठरवा. उद्या नको. उद्या गेला की गेला. तो कुणी पाहिला? तो उद्या आत्ताच पदरात पाडून घ्या आणि तो पदरात पडण्यासाठी भाऊ, तुम्ही जिथे कुठे असाल तिथून भरभरून आशीर्वाद द्या. शुभंभवतू!

## ...अन् टिश्यू नारळाला मोहोर आला!

उत्तमातला उत्तम जीन शोधायचा आणि ते फळझाड सर्वोत्तम करायचे हे स्वप्न सतत उराशी बाळगून संशोधनाचे काम भाऊंनी हाती घेतले आणि अव्याहतपणे सहकारी शास्त्रज्ञांच्या मदतीने ते करीत राहीले. १५ वर्षानंतर आंब्याचे टिश्यूकल्चर पद्धतीने झाड बनविण्यात यश मिळाले आणि २०२०-२१ मध्ये त्या टिश्यूच्या झाडाला आंबेही लागले. पण नारळाला अजून यश नव्हते. डिसेंबर २०१२ मध्ये टिश्यूचा नारळ उदमलपेठ येथे लावण्याच्या दृष्टीने कामाला सुरूवात करण्यात आली. १४ सप्टेंबर २०१३ रोजी उदमलपेठ येथे झाडाला आलेल्या नारळाचा टिश्यू कल्चर पद्धतीने रोप तयार करण्यासाठी वापरण्यात आला. जून २०१५ मध्ये पहिला अंकुर बाटलीत जन्माला आला. १२ डिसेंबर २०१५ मध्ये या अंकुरापासून तयार झालेले रोप भवरलालजींच्या हस्ते त्यांच्या वाढदिवसाच्या निमित्ताने लावण्यात आले. त्यानंतर २०१८ मध्ये टिश्यूची नारळाची रोपे शेतात लावण्यात आली आणि चार वर्षात म्हणजे मे २०२२ मध्ये या झाडांना फुलोरा येऊन फळे लागली. भाऊंच्या निधनानंतर सहा वर्षांनी नारळाचे झाड फळांनी लदबलले आणि टिश्यूकल्चरचे नारळातील तंत्रज्ञान उदमलपेठ येथे प्रथम यशस्वी झाले. नारळाचे टिश्यूकल्चर पद्धतीने तयार केलेले रोप यशस्वी झाले आहे. भाऊ हे वरून पाहात असतील. किती म्हणून त्यांना आनंद झाला असेल याची कल्पना आपण करू शकता.






# मुक्तहस्ते ज्ञानदान हा भाऊंचा स्वभाव

ज्ञान मिळविणे ही एक साधना आहे. मिळविलेले ज्ञान सर्वांना वाटणे हे समत्व आहे. माझ्याप्रमाणेच इतरांचाही विकास व्हावा ही आंतरिक भावना त्यात सामावलेली आहे. एकाच वेळी अनेक विषयांवर भाऊंचे संशोधन चालत असे. प्रयोग व संशोधन यातून निर्माण झालेली नविन माहिती, ज्ञान याचे मुक्तहस्ताने भाऊ सहकाऱ्यांमध्ये वाटप करीत. आज ज्याला आपण 'नॉलेज शेअरींग' म्हणतो ते करण्यासाठी मनाचा मोठेपणा लागतो. या शेअरींगमुळे जाणिवा समृद्ध होतात. उपासना ज्ञानाला पूरक असते. कर्माची परिसमाप्ती ज्ञानात होते. ज्ञानाशिवाय कर्म व कर्माशिवाय ज्ञान असू शकत नाही. ज्ञानाशिवाय कर्म आंधळे ठरते. कर्माशिवाय ज्ञान पांगळे ठरते. शुष्क ज्ञान माणसाला एकाकी पाडते. घटपटांच्या मस्तीत अडकवते. ज्ञानाच्या कुस्त्या लावण्यासाठी उपयोगी पडते. यातून हाती काही फारसे लागत नाही. परंतु ज्ञाननिष्ठा आणि कर्मनिष्ठा मिळून जीवननिष्ठा निर्माण होते. निष्काम कर्माने मन शुद्ध होते. असे मन आत्मज्ञानाला जवळचे ठरते. ज्ञानात प्रेम असले की, त्याचे रूपांतर भक्तीत होते. संत एकनाथ म्हणतात, 'भक्ती प्रेमाविण ज्ञान नको देवा' ज्ञान आपण वाटत राहीलो तर ते वाढते यावर मोठ्या भाऊंची नितांत श्रद्धा होती. त्यामुळे मनाला समजावून घेऊन मनाला चांगल्या बाबींकडे वळविणे हे त्यांनी व्रत मानले. त्यासाठी मनोविज्ञानाचा आधार घेतला. मनाच्या विज्ञानात मनाची गती, मनाची अवस्था आणि मनाची भावांतरे यांचा विचार महत्वाचा ठरतो. चागंल्या बाबी आपल्याच मनाला काय पण इतरांच्याही मनाला समजल्या पाहिजेत हा भाऊंचा आग्रह होता. त्यामुळे त्यांनी माहिती, ज्ञान कधी दडवले नाही. जिज्ञासेच्या खोलीत जर मनाला डांबून ठेवले तर हळूहळू मनाला त्याची सवय लागते. ती चांगली व हितपयोगी नाही. मनाला त्यासाठी थोडे विश्वासात घ्यावे लागते. मनाशी मैत्री करावी लागते. म्हणजे मन चांगल्या गोष्टींकडे वळते.



*शेतकऱ्यांशी अनुभवाची देवाणघेवाण करू संवाद साधताना भाऊ.*



*ग्रीनहाऊसमध्ये वाढविण्यात आलेले जैन स्विट ऑरेंजचे मातृवृक्ष*

शेतीमाल नाशवंत आहे. फळे, भाजीपाला यांची वेळीचे विल्हेवाट लावली नाही तर तो खराब होतो. फेकून द्यावा लागतो. शेतकऱ्याचे नुकसान होते. आज देशात एक टक्का शेतमालावर प्रक्रिया होते आणि ५२ हजार कोटी रूपयांचा शेतमाल खराब झाला म्हणून दरवर्षी फेकून द्यावा लागतो. त्यामुळे शेतीमालावर प्रक्रिया करणारी कारखानदारी जिथे कच्चा मालाचे उत्पादन होते त्याच भागात उभी केली पाहिजे, असा निर्धार करून भाऊंनी केळी, कांदा, आंबा यावर प्रक्रिया करणारी कारखानदारी जळगांव, चित्तूर, उदमलपेठ येथे उभी केली. ही कारखानदारी यशस्वी व्हायची असेल तर प्रक्रियेसाठी आवश्यक असणाऱ्या व्हरायटी (जाती) वाढविणे गरजेचे होते. कोणत्या व्हरायटींवर प्रक्रिया केली जाते याचा अगोदर भाऊंनी अभ्यास केला. या व्हरायटी आपल्या भागातला शेतकरी लावतो की नाही याचा तलास घेतला. व्हरायटींचा गृहपाठ चांगला झाल्यानंतर भाऊंच्या असे लक्षात आले की, प्रक्रियेसाठी आवश्यक व अनिवार्य असणाऱ्या फळांच्या जातीच आपल्याकडे उपलब्ध नाहीत. मग या जाती आयात करून त्या वाढविण्याचा गृहपाठ करावा लागला. गृहपाठ प्रत्येक घटकात आहे. सृष्टीचाही गृहपाठ पृथ्वी, आप, तेज. वायू, आकाश ही पंचमहाभूते घेतात. पृथ्वीतून सोशिकता, आपातून जीवनता, तेजातून प्रकाशता, वायूतून सर्वस्पर्शितता, आकाशातून अनुभवाचा व्यापक शब्द, ही सारी मूल्ये विश्वाच्या गृहपाठात येतात. हा गृहपाठ ऋतुंच्या माध्यमातून येतो. हा गृहपाठ दिशांना करावा लागतो. त्यावर दिशा गृहपाठ करतात. त्यातून सृष्टीची रहस्ये उलगडतात. त्यातून त्याला नव्या अभ्यासाच्या उर्मी येतात. अशा गृहपाठात शास्त्रज्ञ, तत्वज्ञ, आत्मज्ञ, उद्योजक स्वत:ला झोकून देतात. मग मोठे भाऊ याला कसे अपवाद असणार? या अभ्यास व गृहपाठामुळे सृष्टीतली रहस्ये नवेपणाने त्यांना कळली. ही रहस्ये कृतीत उतरविण्यासाठी संशोधनाचा मार्ग त्यांनी स्विकारला. नव्या-नव्या वाटा धुंडाळल्या. या वाटांनी जगण्याला आधुनिक रूप दिले. काळही नवा झाला. ब्राझिलमधून स्वीट ऑरेंजच्या रसासाठी वापरल्या जाणाऱ्या व्हॅलेंशिया, नेव्हल, नटाल, पेरा, हॅम्लिन, वेस्टीन यांसारख्या जातींची आयात झाली. त्यांचे मातृवृक्ष जळगांवातील जैन हिल्सच्या ग्रीनहाऊस मध्ये वाढविण्यात आले. टिश्यूकल्चर तंत्रज्ञानाचा वापर करून जैन इरिगेशनने बनविलेली मोसंबीची ही रोपे शेतकऱ्यांना शेतात लागवडीसाठी देण्यात आली. तिसऱ्या-चौथ्या वर्षापासून मोसंबीच्या एकेका झाडाला ४०० ते ५०० मोसंब्या लगडल्या. झाड फळांनी लदबदून गेले. एकाग्रता आणि मेहनत जिथे एकत्र झाली तिथे गृहपाठ यशस्वी झाला. गृहपाठाला शाईपेक्षा अधिक लक्ष लागते. संवाद हा गृहपाठाला मदत करतो. प्रश्नांची उत्तरे



शोधतो. सत्संगाने गृहपाठाची सवय लागते. अभ्यास कर असे सांगावे लागत नाही. पण संवाद आणि अभ्यास यांची सवय किती शेतकऱ्यांना आहे ? मनामनांचा खुला संवाद आज जवळपास दुर्मिळ झाला आहे. जो तो उपयुक्त माहिती दडविण्याच्या प्रयत्नात आहे. नको त्या वांझोट्या व अर्थहीन माहितीचा सोशल मिडीयावर महापूर आला आहे. त्यातून कुणाचे भले होणार? गृहपाठ व अभ्यासाचा उपयोग आपण कसा काय करतो, हे ज्याचे त्याने सुज्ञ बुद्धीने ठरवायचे आहे. जग सर्वार्थाने जवळ आले आहे; पण माणसांमाणसांना गृहपाठ उरले नाहीत. संगणकाच्या तांत्रिक ज्ञानात आपण अडकून पडलो. त्यामुळे स्वतंत्र असे गृहपाठ झाले नाहीत. माणसांच्या स्वभावाचा गृहपाठ पक्का नाही करता येत. कारण स्वभाव बदलता आणि बदला घेणाराही असतो. तरीही हे गृहपाठाला आव्हान आहे. गृहपाठ पक्का असल्याशिवाय शेतीतला कोणताही प्रकल्प यशस्वीतेच्या दिशेने जाऊ शकणार नाही. या पक्क्या अभ्यासानेच मनातले सृजन सांभाळता येऊन यातून चिंतन निर्माण होईल, ते विकासाच्या नवनवीन वाटा दाखवेल.

शेती पिकायची असेल तर पुरेसे पाणी हवे. बिनपाण्याची शेती शक्य होणार नाही. पावसाचे पाणी अडवून, मुरवून जिरवून, साठवून काटकसरीने व जपून वापरल्याशिवाय महाराष्ट्राच्या शेतीला आणि दुष्काळी भागातील शेतकऱ्यांना पर्याय नाही. यासाठी मोठ्या भाऊंनी १९८७ साली भारतात सर्वप्रथम सुक्ष्मसिंचनाचे म्हणजे ठिबक व तुषार सिंचनाचे तंत्रज्ञान आणले. सुरूवातीला लोकांचा विश्वास बसत नव्हता. थेंब-थेंब पाण्यावर कुठे पिके येतील का ? असे म्हणून शेतकरी अनेक प्रश्न व शंका उपस्थित करायचे. प्रत्येकाचे मन संशयाने भरलेले होते. निरनिराळ्या प्रकल्पाचे पथदर्शी ठिबक/तुषार सिंचनावर उभे करून भाऊंनी शेतकऱ्यांना अत्यंत कमी पाण्यात किती उत्कृष्ट पिके येऊ शकतात हे कृतीतून दाखवून दिले. पिकाची पाण्याची गरज फार मोठी नाही हे तेव्हा शेतकऱ्यांच्या लक्षात आले. नंतर जैन इरिगेशनने व भाऊंनी पुढाकार घेऊन विविध पिकांच्या सिंचन, फर्टिगेशन, ग्रीनहाऊस, पॉलिहाऊस, सघन व अतिसघन लागवड पद्धतीने फळबागांची उभारणी, ठिबक व तुषार सिंचनावर गहू, तांदूळ, ज्वारी, बाजरी, मका, हरभरा यांसारखी पिके घेतली. अशा शंभराहून अधिक पिकांवर निरनिराळे प्रयोग केले, संशोधनाचे कार्यक्रम हाती घेतले. देशाची अन्नधान्याची स्वयंपूर्णता टिकविण्यासाठी आपण १९४७ म्हणजे स्वातंत्र्यापासून सातत्याने प्रयत्न करतो आहोत. १९४७ पासून देशात 'अधिक धान्य पिकवा' ही मोहिमही राबविली गेली. १९६५ साली हरितक्रांती



*भाऊंची विचारधारा व असिधाराव्रत समर्थपणाने खांद्यावर पेलून ते पुढे नेणारे जैन इरिगेशन कंपनीचे अध्यक्ष श्री. अशोक जैन, उपाध्यक्ष अनिल जैन, सह-व्यवस्थापकीय संचालक अजित जैन आणि अतुल जैन*



*२००८ मध्ये ठिबक सिंचनावर घेतलेले भाताचे पिक किती उत्तम येते हे श्री. शरद पवार यांना दाखविताना कंपनीचे संस्थापक अध्यक्ष भवरलाल जैन आणि सह-व्यवस्थापकीय संचालक अजित जैन.*

करण्याचा प्रयत्न केला. तेव्हा संकरित बियाणे आणि रासायनिक खतांचा वापर मोठ्या प्रमाणावर करण्यात आला. सिंचन सुविधा वाढविण्यासाठी मोठ्या धरणांची बांधणी करण्याचा कार्यक्रम आपण स्वातंत्र्यानंतर लगेचच हाती घेतला होता. सिंचन सुविधा निर्माण झाल्यावर काही प्रमाणात अन्नधान्य उपादनात निश्चित वाढ झाली पण खूप मोठ्या प्रमाणावर पाणी उस गहू या पिकांना वापरले जाऊ लागले. भवरलाल जैन यांनी ठिबक सिंचनाचे साहित्य भारतात बनविण्यास प्रारंभ केल्यानंतर हे साहित्य मुख्यत्वे फळबागा व नगदीच्या पिकांसाठी (उदा. द्राक्षे, केळी वापरले गेले. पण गहू, तांदूळ, ज्वारी, बाजरी, तूर यासारख्या पिकांसाठी ठिबक सिंचनाचा वापर कुणी करीत नव्हते. १५-२० वर्षांपूर्वी जैन इरिगेशन कंपनीने तांदूळ, गहू, हरभरा, तूर यांसारखी पिके ठिबक व तुषार सिंचनावर घेऊन त्यांचे पथदर्शी प्रकल्प अनेक ठिकाणी देशभर उभारले. परंपरागत प्रवाही पद्धतीने पाणी देऊन या तृणधान्य पिकांचे जेवढे उपादन येते त्यापेक्षा अधिक ऊत्पादन ठिबक- तुषार संचाचा वापर केला तर येते. शिवाय पाणी बचत होऊन खतही कमी लागते. त्यामुळे उपादन खर्च कमी होतो. आता हे सिंचनाचे शास्त्र किती यशस्वी आहे हे संशोधनाने सिद्ध झालेले असले तरी शेतकरी मात्र मोठ्या संख्येने तृणधान्याच्या पिकांसाठी या सूक्ष्म सिंचन पद्धतीचा वापर करीत नाहीत ही भाऊंच्या मनातील खंत होती.

जैन हिल्सचा संपूर्ण परिसर संशोधनाचे व शास्त्रशुद्ध पाणलोट विकासाचे (रिज टू बॉटम) एक परिपूर्ण व अद्ययावत मॉडेल म्हणून उभे राहीले. भाऊंच्या या संशोधनात्मक दृष्टीने एक नवी सृष्टी जैन हिल्सच्या रूपाने जळगांवात उभी राहिली. ही सृष्टी त्या-त्या ऋतुतली रमणीयता त्यांच्या आंतरिक जाणिवांना समृद्ध करते. सृष्टीत 'मी चा मुळातून विचार व्हायला आरंभ होतो'. मी 'ची सारी पाळेमुळे सृष्टीच्या सानिध्यात मोकळी होतात. अस्सलपणातले ते सच्चे माहेर असते. इथे तपाला रम्य वातावरण लाभते. मनाशी मोकळा संवाद घडतो. उपरा संकोच सहज मावळतो. श्वासाला नवा अर्थ कळतो. यातील मौन नवे होते. सहजतेची खरी कसोटी लागते. अभ्यासाच्या नव्या दिशा उगवतात. संवेदनांना वेगळे रूप येते. तोचतोचपणाला जागा मिळत नाही. सतत नवेनवे काहीतरी करावेसे वाटते. मुख्य म्हणजे, मन. व्यवहारातल्या रूक्षतेत अडकत नाही. सृष्टीतून वृत्ती तरल होतात. म्हणून जैन हिल्सला सर्वांनी आपले मानले आहे. तुम्हीही याचा अनुभव घेण्यासाठी एकदा तरी जैन हिल्सला नक्की या! फक्त एकच प्रश्न मनात सारखा रूंजी घालतो, तो म्हणजे भवरलालजी या माणसाला एका जन्मात व एका आयुष्यात ही हिमालयाएवढी असंख्य कामे कशी उभी करता आली ? मला तरी अजून या प्रश्नाचे उत्तर सापडलेले नाही. बघा, तुम्हाला सापडतंय का?




# जगनमान्य कृषिउद्योजक आणि शेतकऱ्यांचा मानबिंदू
# पद्मश्री डॉ. भवरलाल जैन

**राहुरी येथील महात्मा फुले कृषी विद्यापीठामध्ये ठिबक सिंचनावर पिके घ्यावीत यासाठीचे प्रयोग करण्यासाठी डॉ.भवरलाल जैन यांनी १९९० च्या सुमारास एक ट्रकभर ठिबक सिंचनाचे साहित्य विद्यापीठाला भेट म्हणून पाठविले आणि तेव्हांपासून विद्यापीठात ठिबकचे संशोधन सुरू झाले. विद्यापीठानाही संशोधनाची ही दिशा भाऊनीच दाखविली.**



**डॉ. शंकरराव मगर**
माजी कुलगुरू
अध्यक्ष, संशोधन सल्लागार समिती,
संशोधन एकात्मिक शेती पद्धत, मोदीपुरम, मिरज, उ.प्र.

भारतीय मृदविज्ञान सोसायटी नवी दिल्ली या संस्थेचे ८६ वे वार्षिक अधिवेशन म.फु.कृ.वि. राहुरी येथे दि. १५ नोव्हेंबर २०२२ रोजी संपन्न झाले. उद्घाटन समारंभ झाल्यावर मुख्य सभागृहात आंतरराष्ट्रीय जलसिंचन व्यवस्थापन संस्थेचे निर्देशक आणि मुख्य वक्ते डॉ. ए.के. डिक्का यांच्या भाषणात राहुरीतील सुक्ष्मसिंचनाचा आणि स्व. डॉ. पद्मश्री भवरलाल जैन यांचा आदरपूर्वक उल्लेख आला आणि समोर बसलेल्या माझ्या मनात डॉ. भाऊंच्या विषयीच्या आठवणींचा हलकल्लोळ उसळला. सुक्ष्म सिंचनाच्या उदयाचा तो 1981 ते ८६ सालचा काळ होता. ठिबक सिंचन काळातील सर्वश्री भवरलाल जैन, डॉ. आप्पासाहेब पवार आणि डॉ. अण्णासाहेब शिंदे या रथी महारथींच्या योगदानाची महती आज महाराष्ट्र राज्यास फलोद्यान, नगदी पिके, ऊस, डाळींब, बोरासहित निर्यातीसाठी पटली. डॉ. अप्पासाहेब पवार, ठिबक विस्तार कार्यात तर डॉ. अण्णासाहेब शिंदे समाज-अर्थशास्त्रात पारंगत होते. पद्मश्री डॉ. भवरलाल जैन सर्वगुण पारंगत पण कृषिद्योग, कृषिकारखानदारीत सर्वोच्च होते. या तीन कृषिक्रांतीच्या योगीराजांची संयुक्त कामगिरी महाराष्ट्रास काय पण संपूर्ण देशात अग्रेसर राहील. स्व. भाऊंनी तर सुक्ष्मसिंचन सामुग्री निर्मितीमध्ये जगात पहिला नंबर मिळविला. आपला देश भाऊंचे लाख मोलाचे ऋण कधीच फेडू शकणार नाही. किंबहूना माझ्यासारखे हजारो अनुयाई त्यांच्या ऋणात कायमच राहू इच्छितात.

मृदविज्ञान सोसायटीची दुपारची विषयावर चर्चासत्रे सुरू झाली पण माझे लक्ष आंतरविद्याधारक, जलसिंचन विभागाच्या प्रक्षेत्रावरील सुक्ष्मसिंचन पद्धती संग्रहालय आणि प्रात्याक्षिकाच्या प्लॉटकडे लागले होते. संध्याकाळ चारची किरणे प्रात्याक्षिकावर खिळली. डॉ. एम.एस. माने विभागप्रमुख उपस्थित होते. पण माझे मन १९८६ सालच्या गोष्टीभोवती फिरत होते. तंत्रज्ञानपूर्वक अथक काम करावयाची आमची तयारी होती. विंधन विहीर घेऊन २ लिटर प्रतिसेकंद असा अल्प प्रवाह मिळाला पण त्यास ठिबकची जोड हवी होती. प्रशासनाकडून अल्प प्रतिसाद मिळत होता. ठिबक सिंचन प्रसारणाची भाऊंना पूर्ण कल्पना होती. स्व. भाऊंकडे नियोजनपूर्वक आकृतीसह सामानाची कैफियत मांडली होती. ऑफीस सुटल्यानंतर सायंकाळी ७.०० वाजता खिन्न मनाने बसलो असता एक सदगृहस्थ मे. जैन इरिगेशन सिस्टीम्स लि. कडून आलो असून बाहेर बोलवित होते. विद्यापीठ इमारतीच्या पूर्वकडील गेटवर भला मोठा ट्रक ठिबक सिंचन सामुग्रीने भरलेल्या स्थितीत उभा होता. आपल्या विनंतीनुसार



*ठिबकवरील चर्चासत्रात भवरलाल जैन बोलताना समोर डॉ.आप्पासाहेब पवार, डॉ. संपतराव जाधव , डॉ. ज्ञानदेव हापसे व इतर*

आदरणीय भाऊंनी ही सामुग्री भेट म्हणून विनामूल्य पाठवून दिली आहे. कामावर-शास्त्रावर अलोट प्रेम असणारे आदरणीय भाऊ मी कधीच विसरू शकणार नाही. विविध प्रकारच्या ठिबक सिंचन पद्धतीच्या प्रात्याक्षिकावर तदनंतर विद्यापीठास भेट देणारे कुलपती व महोदयास राज्यपाल आदरणीय शंकर दयाळ शर्मा, अर्धा तास थांबून माहिती घेत होते. त्यावेळेस प्रात्यक्षिकामध्ये सुधारणा करून डॉ. पी. पाटील कुलगुरू आणि डॉ. माने यांनी डिजीटल व स्वयंचलित पद्धती बसवून भाऊंना श्रद्धांजली वाहिली आहे. जागतिक दर्जाची, सुक्ष्मसिंचनाची तांत्रिक पुस्तके देऊन आपल्या आपल्या शेतकऱ्यांच्या स्थानिक परिस्थितीनुसार, खोल काळी जमीन, मचूळ पाणी, पिकाची दररोजची पाण्याची गरज, आणि पिकांच्या नाजूक अवस्था यावर मार्गदर्शन करा असे फर्मान सोडले. उपनळीवरील तोट्याचे महत्व कमी होऊन बायव्हॉल उपनळ्या व जमिनीखालून ओलावा पद्धत आली. सोलापूर येथील एका शेतकरी मेळाव्यात आप्पासाहेबसहीत आमच्यापेक्षा जास्त टाळ्या भाऊंना मिळाल्या होत्या हे विसरणे कठीण आहे. गुणवत्ता, मग ती माणसातली असेल अथवा साधनसामुग्रीमधील असेल, हा 'स्व' भाऊंचा आत्मा होता. मी जैन इरिगेशन हिल्सला मुक्कामला आल्यावर रात्री मला निरोप येत असे. पहाटे ५ वाजता तयार रहा. त्यावेळेत १ मिनीट सुद्धा उशीर होत नव्हता. आज मी माझ्या सर्व सहकाऱ्यांना सोडून १ तास दिलखूष गप्पा तुमच्या बरोबर मारणार आहे. मी एकदा मनाची धिष्टपणा करून विचारले, 'भाऊ अनेक शास्त्रज्ञ, कृषि अभियंते , उत्तम प्रशासक असताना मग तुम्ही मलाच का एवढे महत्व का देता?' भाऊंचे उत्तर सामाजिक बांधिलकीशी निगडीत होते. ते म्हणाले, की मला भेटायला येणाऱ्या शेतकऱ्यांना आवडणाऱ्या शास्त्रज्ञांचे नाव सांगा असे विचारायचे आणि तुम्हाला आश्चर्य वाटेल. जवळजवळ ९९ टक्के लोकांची संमती तुमच्या नावावर येते.

देशाच्या केंद्र सरकारने आदरणीय शरद पवार साहेबांच्या नंतर कृषिखात्यामार्फत आर्थिक सवलत जाहीर केली परंतु राष्ट्रीयस्तरावर नियोजनसाठी सुक्ष्मसिंचन कमेटी तत्कालिन आंध्रप्रदेशाचे मुख्यमंत्री चंद्राबाबू नायडू यांच्या अध्यक्षतेखाली कमिटी नेमली होती, त्यात भाऊंचे योगदान अप्रतिम होते. त्यांच्याच शेजारी मी बसून त्यांना मदत करीत होतो. आयोगाचे सचिव उपमहानिर्देशक एच.पी. सिंग पुढे भाऊंचे अनुयायी झाले. त्यांनी जैन इरिगेशन कंपनीला सर्वतोपरी मदत केली.

स्व. भाऊंच्या बरोबरच प्रवास चालूच राहील. शेतकऱ्यांबद्दल तुम्हाला एवढे प्रेम का वाटते? असे विचारल्यावर, भाऊ मला त्यांच्या अँटीचेंबरमध्ये घेऊन गेले आणि त्यांच्या वाकोद गावी शेतावर मजुरांच्या बरोबर विहीरीतील खडक फोडीत असतानाची "ब्लॅक आणि व्हाईट" फिल्म दाखवली. मुळ पाया भक्कम असल्यावर मंदिर कसे सुशोभित होते हे लक्षात आले. आठवणीच्या



*नवी दिल्ली येथील भारतीय कृषी अनुसंधान परिषदेचे महासंचालक डॉ. मंगला राय हे कोकण कृषी विद्यापीठाने दिलेली सन्माननीय डॉक्टरेट ही पदवी भवरलाल जैन यांना प्रदान करताना, शेजारी कुलगुरू डॉ.शंकरराव मगर.*



*भवरलाल जैन यांच्या समवेत डॉ. शंकरराव मगर, राजेंद्र आप्पासाहेब पवार, डॉ. दोशी व अन्य मान्यवर*

हिंदोळ्यावर मनसोक्त झोके घेत घेत १९८५ ते २०१६ अशी ३०-३१ वर्षे कुठे व कशी निघून गेली ते कळलेच नाही. भाऊंच्या प्रेमाचा अविष्कार कायमच राहीला. ईस्त्राइलचे गुणगान करीत होतो पण संधी मिळाली नव्हती. आदरणीय भाऊंनी फक्त संधीच दिली नाही तर कविवर्य ना.धों. महानोर आणि अभय जैन यांच्याबरोबर शेतकऱ्यांचे नेतृत्व इस्त्राईलमध्ये करण्याची संधी १९९३ साली तर तसेच डिलरच्या गटाचे नेतृत्व २००५ साली दिले.

अथक प्रयत्न, चिकाटी आणि गुरूजनांच्या आर्शिवादावर फेब्रुवारी २००० साली कोकण कृषि विद्यापाठीच्या कुलगुरूपदी हजर झालो. त्यापैकी आदरणीय भाऊंची प्रतिक्रिया मला कोकणात काम करण्याचे हत्तीचे बळ देऊन गेली. भाऊंच्याविषयी कृतज्ञता व्यक्त करण्याची आणि भाऊंना सुशोभित विद्यापीठ परिसर दाखवण्याची संधी शोधत होतो. जैन इरिगेशन संशोधन केंद्रास विद्यापीठाच्या मान्यतेसाठी विद्यापीठ कार्यकारी परिषद सदस्य जळगांव जाऊन आले. जैन इरिगेशन कंपनीचे कार्य पाहिल्यावर परिषदेचे सदस्य व विधान परिषदेचे सदस्य श्री. मोडक यांनी भाऊंना डॉक्टरेट (डी लिट) पदवी देण्याचा प्रस्ताव मांडला. आदरणीय कुलपती यांनीही त्वरीत मान्यता दिली. भाऊंना डॉक्टरेट ही पदवी देणारे देशातील पहिले विद्यापीठ होण्याचा मान डॉ. बाळासाहेब सावंत कोकण कृषी विद्यापीठाला मिळाला. हा आनंदाचा ऋणानुबंधाचा क्षण होत. २००६ सालच्या पदवी समारंभात कुलपती व प्रति कुलपती (कृषिमंत्री) उपस्थित राहू शकले नाहीत. त्यामुळे कुलगुरू म्हणजेच माझ्या हस्ते आदरणीय मोठ्या भाऊंना डॉक्टरेट ही पदवी दिली. पदवीदान समारंभाचा प्रोटोकॉल सांभाळून त्यांना बोलण्याची संधी अध्यक्ष या नात्याने दिली. डॉ. मंगला रॉय, महानिदेशक कृषी अनुसंधान, नवी दिल्ली हे प्रमुख पाहुणे होते. त्या दोघांची भाषणे म्हणजे एक पर्वणी झाली होती. कधीही न येणारे दापोलीकर बहुसंख्येने हजर होते. माझ्या आयुष्यातील कृतज्ञता व्यक्त करण्याच्या क्षणांनी मी आनंदित होत होतो.

कालाय तस्मेन: महा: काळ कोणासाठी थांबत नाही. इतिहासात नोंद होईल अशी १२ डिसेंबरची तारीख महत्वाकांक्षी नेते, आणि बहुजनांच्या गळ्यातले ताईत पद्मभूषण डॉ. शरद पवार तसेच स्वर्गीय गोपीनाथ मुंडे यांच्या बरोबरच पद्मश्री डॉ. भवरलाल जैन यांना लाभली. आज आपण त्यांची ८४वी जयंती साजरी करीत आहोत. त्यांच्या आदर्श शिकवणीची आणि जीवनमूल्यांची आदरणीय अशोक भाऊ तसेच त्यांचा बंधूवर्ग यांच्या साक्षीने अंमलात आणण्याची प्रतिज्ञा करणार आहोत. स्व. मोठ्या भाऊंच्या जयंतीनिमित्त भावपूर्ण श्रद्धांजली त्यांना अर्पण करीत आहे.




# भाऊंचे साहित्य

## सकारात्मक ऊर्जेचा स्त्रोत

- ज्ञानेश्वर शेंडे

## प्रतिभा आणि साहित्यसृष्टी

साहित्य, समाज आणि संस्कृतीच्या व्यापक स्तरावर श्रद्धेय मोठ्याभाऊंच्या समग्र साहित्यसंपदेचा अभ्यास नामांकित प्रज्ञावंतांनी आणि प्रतिभावंतांनी केला आहे. भाऊंच्या स्वनिर्मित साहित्यातल्या भावना आणि विचारांच्या समतोलातून प्रकट होणारे त्यांचे मानस, त्यांची संवेदनशीलता यावर अनेक क्षेत्रांतल्या बहुश्रुत विचारवंतांनी विशेष भाष्य केले आहे. विविध प्रसारमाध्यमांतील अनुभवी-मुरब्बी संवादकांनी, पत्रकारांनी, मुलाखतकारांनी ते थेट शेतशिवारात राबणाऱ्या शेतकऱ्यांनी, बहुविध क्षेत्रांत कार्यरत वाचकांनी भाऊंच्या जीवनशैलीविषयी, साहित्याविषयी, कर्तृत्वाविषयी भाष्य केले आहे, वेळोवेळी अभिप्राय व्यक्त केले आहेत. एकूणच त्यांच्या साहित्यातून भावणारी त्यांची विवेकदृष्टी, वैविध्यपूर्ण आणि वैशिष्ट्यपूर्ण विषयांबाबतचे त्यांचे दृष्टिकोन, त्यांची विलक्षण कल्पनाशक्ती अनेकांच्या औत्सुक्याचे हे प्रेरणादायी विषय आहेत. भाऊंच्या आयुष्यातील सांस्कृतिक संचिताच्या सत्त्वशीलतेचे प्रचीतीदर्शन म्हणजे त्यांचे साहित्य आहे. "सार्थक करूया जन्माचे । रूप पालटू वसुंधरेचे ॥" हे जीवन-लक्ष्य असणाऱ्या भाऊंचे साहित्य पूर्णतः सकारात्मक ऊर्जा प्रदान करते. जगणे स्वतःसह इतरांसाठीही सुखावह व्हावे असे वाटत असेल, तर भाऊंचे साहित्य आत्मपरीक्षणाचा मार्ग खुला करून देते.



## संस्मरणीय जागरण

भाऊंचे साहित्य स्वअनुभूतीचा कृतिशील परिपाठ आहे. "जन्माला आलो त्यावेळी ही पृथ्वी जशी होती तशीच न राखता, माझ्या स्वतःच्या अंतिम क्षणाआधी ही पृथ्वी थोडीतरी सुंदर करून जाईन," या महातत्त्वाचं पुनःपुन्हा संस्मरण, जागरण आणि आचरण म्हणजे भाऊंचे साहित्य आहे. म्हणूनच कविवर्य ना. धों. महानोर या प्रिय मित्राचा गौरव करताना भाऊ एक शाश्वत सत्य सांगून गेले : "आपल्या मृत्यूनंतर जगाला आपला विसर पडावा असे होऊ द्यायचे नसेल तर दोनपैकी एक गोष्ट केली पाहिजे. असे काहीतरी काम केले पाहिजे, ज्याबद्दल लोक लिहित राहतील किंवा असे काहीतरी लिहायला पाहिजे, जे लोक वाचत राहतील."

"चांगला, उत्तम व मंगल विचार हा स्वःमनाचा उत्कृष्ट आविष्कार असतो. चालण्यासाठी वाट असते, वाटेवर चालणं नसतं. जीवनाच्या वाटेवर पायानं चालणारे केवळ अंतर कापतात, तर विवेकानं चालणारे ध्येय गाठतात. ही वाटचाल गाठीला पैसा




*ती आणि मी या पुस्तकाच्या प्रकाशन समारंभाप्रसंगी डावीकडून न्या. चंद्रशेखर धर्माधिकारी, कवी ना.धों. महानोर, डॉ. भालचंद्र नेमाडे, विजया राजाध्यक्ष, भवरलाल जैन, भरतकुमार राऊत*

बांधून किंवा ऐहिक सुखसाधनांच्या मागे धावून पूर्ण होत नसते, तर त्यासाठी समतोल विचारांची शिदोरी बांधावी लागते..." असे म्हणणाऱ्या भाऊंच्या साहित्यसृष्टीचे दर्शन आपण घेणार आहोत...

**"ती आणि मी" लोकप्रियतेचा उच्चांक आणि एकमेवाद्वितीय...**

मोठ्याभाऊंची पंचवीसच्या वर पुस्तके वाचकांकरिता उपलब्ध आहेत. त्यात भाऊंनी लिहिलेली, भाऊंवर लिहिलेली आणि दोन-तीन पुस्तके कंपनीच्या संदर्भात असलेली अशी साहित्यसंपदा प्रकाशित झाली आहे. भाऊंचे सर्वांत लोकप्रिय पुस्तक "ती आणि मी" असून, आजपर्यंत एक लाखाच्या वर प्रती वाचकांपर्यंत पोहोचल्या आहेत. या पुस्तकाचा हिंदी, इंग्रजी, पंजाबी भावानुवाद प्रकाशित करण्यात आला आहे. वाचकांनी फार दूरवरून आणि मोठ्या संख्येने भाऊंशी पत्रसंवाद साधला. अनेकांनी फोनवरून लेखकाशी मनमोकळेपणे चर्चाही केली. काही वाचकांनी परिवारासह लेखकाची थेट भेट घेण्याचा धडाकाही अवलंबला. "ती आणि मी ः प्रतिसाद" पुस्तकात शोधक वाचकांना हा प्रतिसाद पाहता येईल.

सहजीवनाची नोंद घेणारी अनेक पुस्तके मराठीत आहेत; परंतु ही पुस्तके बहुसंख्येने महिलांनीच लिहिलेली आहेत. दोन-तीन पुस्तके पतीने पत्नीविषयी लिहिलेली. इतकी तफावत त्यात आहे. कौटुंबिक ताण्याबाण्याचा समग्र वेध घेत, भावी पिढीला निकोप-निरामय आयुष्य जगता येण्यासाठी दिशा देणारे, डोळ्यांत अंजन घालणारे, एवढ्या विस्तृत स्वरूपात पत्नीच्या साथसंगतीची नोंद घेणारे, उद्योजकाने पत्नीविषयी लिहिलेले मराठी साहित्यातले हे पहिलेच पुस्तक! अनेकदृष्ट्या "ती आणि मी" एकूणच मराठी साहित्यात आगळेवेगळे, अगदीच वैशिष्ट्यपूर्ण ठरले आहे.

**डॉ. भालचंद्र नेमाडे आणि "ती आणि मी"**

ज्ञानपीठ पुरस्कार विजेते, पद्मश्री डॉ. भालचंद्र नेमाडे यांनी प्रस्तावना लिहिलेले मराठीतील हे एकमेव आत्मकथनपर हृदगत! डॉ. भालचंद्र नेमाडे यांच्यासारख्या स्पष्टवक्त्या समीक्षकाची प्रस्तावना लाभणे, ही अतिशय दुर्मिळ बाब! डॉ. नेमाडे प्रस्तावनेत म्हणतात, "रा. भवरलाल उद्योजक झाले नसते, तर साहित्यिक झाले असते, असे स्वतःबद्दल म्हणतात, ते अर्धसत्यच म्हणावे लागेल. कारण, आता ते दोन्ही आहेत. मराठी उद्योजक साहित्यिकांची संख्या वाढावी, अशी अपेक्षा या पुस्तकाच्या निमित्ताने

व्यक्त करावीशी वाटते. मराठीत लिहिणे हे मराठीवर प्रेम व्यक्त करण्याची प्राथमिक कसोटी आहे." डॉ. भालचंद्र नेमाडेंनी भाऊंच्या साहित्यिक असण्याबाबत व्यक्त केलेले हे सकारात्मक आणि स्वागतशील विचार वानगीदाखल पुरेसे आहेत. "ती आणि मी" चे मुखपृष्ठ सुप्रसिद्ध आर्टिस्ट संजय सुरे यांनी समर्पक, कलात्मक आणि तितकेच अपवादात्मक निर्माण केले आहे. मराठीत लाखो पुस्तके प्रकाशित झाली आहेत, दरवर्षी हजारो होतात; परंतु "ती आणि मी" पुस्तकाच्या मुखपृष्ठाचे रेकॉर्ड एकमेवाद्वितीय स्तरावर राहिले आहे; कायमचेच म्हणावे लागेल...!

### सहजीवनाचा पारदर्शक कृतिपाठ

स्वर्गीय कांताबाई भवरलाल जैन यांच्या तेजस्वी व्यक्तिमत्त्वाभोवती गुंफले गेलेले "ती आणि मी" पुस्तक म्हटले तर सहजीवनाचा पारदर्शक कृतिपाठही आहे. साध्या-सरळ; पण मर्मस्पर्शी शब्दांत वाचकांच्या मनाचा आरपार ठाव घेणाऱ्या या पुस्तकाचे सर्वस्पर्शित्व वाखाणण्यासारखेच आहे. भारतीय संस्कृतीने संस्कारित झालेल्या संयुक्त कुटुंबसंस्थेचे संस्मरणीय जागरण म्हणजे "ती आणि मी". सतत मागण्यासाठीच हात पुढे न करता देत राहण्यासाठी हात पुढे करणाऱ्या माणूसपणाची सच्ची परिभाषा आचरणातून सिद्ध करणाऱ्या कांताईंची ही प्रेरक कहाणी आहे. कुटुंबात-परिवारात सर्वांना जोडून ठेवण्यासाठी योग्य वेळी, योग्य तेच बोलण्याची, योग्य कृती करण्याची आवश्यकता असते. अशा समन्वयासोबतच समाजशील कसे जगता येईल, याचे आदर्श उदाहरण म्हणजे कांताई! जैन परिवाराच्या त्या आधारशीला होत्या. त्यांच्या जीवनकार्याचा वेध घेणारा, जैन इरिगेशनच्या सहकाऱ्यांकरिता असलेल्या "भूमिपुत्र" गृहपत्रिकेचा "वात्सल्यपूर्ती" विशेषांक संदर्भासाठी जरूर पाहावा...


पत्नी सौ. कांताबाई यांच्यासमवेत भवरलाल जैन

### "ती आणि मी" पुस्तक घराघरांत...

"सध्या कुणी वाचत नाही, वाचनसंस्कृती लयाला गेली आहे," असा नकारात्मक अनुभव आदरणीय मोठ्याभाऊंच्या कोणत्याही पुस्तकाला आला नाही. याउलट दिवसेंदिवस भाऊंच्या साहित्याची मागणी वाढतच चालली आहे. आपल्या लग्नाच्या वाढदिवसानिमित्त, स्वतःच्या वाढदिवसानिमित्त, शुभविवाहाप्रीत्यर्थ "ती आणि मी" पुस्तक मोठ्या संख्येने इतरांना भेट दिले जाते आहे. नव्या पिढीपर्यंत, नवदाम्पत्यांपर्यंत हे पुस्तक मोठ्या प्रमाणात पोहोचते आहे. माता-पित्याची भूमिका कशी असावी आणि













"आजची समाज रचना आणि तिची पुनर्बांधणी" या भाऊंच्या पुस्तकाचे ज्येष्ठ पत्रकार कुमार केतकर प्रकाशन करताना शेजारी श्री. अच्युतराव अत्रे, श्री. वाय.एस. महाजन, श्री भवरलाल जैन, उमवि कुलगुरू श्री. एस.एफ.पाटील, श्री. केतकर व श्री. अशोक दातार




शिक्षकांनी विद्यार्थ्यांशी कसा संवाद साधावा, यादृष्टीनेही भाऊंची पुस्तके अनेकांना मार्गदर्शक ठरली आहेत. जळगावच्या पंचम नाट्य संस्थेने दृकश्राव्य माध्यमातून रंगमंचीय अभिनव प्रयोग "ती आणि मी" पुस्तकावर सादर केले. ठाणे येथे भरलेल्या अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनात "ती आणि मी" पुस्तकावर दृकश्राव्य नाटक सादर झाले. अखिल भारतीय साहित्य संमेलनाच्या भव्य व्यासपीठावर नाट्यरूपाने सादर झालेले हे एकमेव आत्मकथनपर हृदगत...!

विवाह संस्थेच्या व्यवस्थापनाचा नव्या पद्धतीने आज विचार होतो आहे, नव्या-जुन्या जोडप्यांच्या मनात अनेकदा स्पेसचा प्रश्न डोकावतो आहे. अशा प्रत्येक वेळी "ती आणि मी" च्या निमित्ताने झालेले आत्मपरीक्षण कामात येईल. "पुस्तके खोक्यात न ठेवता, वाचकांच्या डोक्यात उतरायला हवीत." भाऊंच्या या प्रबळ आंतरिक इच्छेचा सन्मान करून "वाचनगाडा" नावाच्या टाटा मॅजिक गाडीच्या सहाय्याने महाराष्ट्रातल्या 22 जिल्ह्यांच्या वर 450 च्या वर गावांना वितरणाकरिता "अक्षरयात्रा" करण्यात आली. मध्य प्रदेश, कर्नाटक, गोवा यातील काही भागांपर्यंत "वाचनगाडा" जाऊन आला. अनेक सभा-संमेलनांमध्ये स्टॉल लावून, ग्रंथोत्सवात सहभागी होऊन, अनेक शाळा-महाविद्यालयांतल्या शिक्षक बंधू-भगिनींपर्यंत भाषण- व्याख्यान-निवेदनाच्या माध्यमातून, जैन इरिगेशनच्या वितरकांचे सहाय्य घेऊन एकट्या "वाचनगाड्या"च्या माध्यमातून 70 हजारांच्या वर पुस्तके विकली गेली. "वाचनगाड्या"वर प्रवास करताना मी हे अनुभवले, की भाऊंच्या समग्र साहित्यसंपदेला अनेक ठिकाणांहून मागणी असून, शासकीय अनुदान प्राप्त केलेल्या वा इतर ग्रंथालयांना तसेच काही परिवारांना स्वतःच्या घरातील खासगी ग्रंथसंग्रहाकरिता भाऊंचे साहित्य हवे आहे.

### समाजचिंतन : समस्यांवरील उपाय... सज्जनशक्ती

2009 मध्ये प्रकाशित झालेले, 18 आवृत्त्या ज्याच्या मुद्रित कराव्या लागल्या असे "ती आणि मी" हे भाऊंचे तिसरे पुस्तक. "आजची समाजरचना : तिचे स्वरूप आणि पुनर्बांधणी" हे दूरदृष्टीचा वेध घेऊन लिहिलेलं पहिलं आणि महत्त्वपूर्ण पुस्तक 2001 मध्ये "ग्रंथाली"च्या "ज्ञानयज्ञमाले"त प्रकाशित झाले. त्या पुस्तकावर बरेच विचारमंथन झाले. सर्वसामान्यांना, विचारवंतांना हे आपलेच विचार कोणीतरी मांडले, असं मनोमनी वाटावं असं हे पुस्तक आहे. देशातील विधी व्यवस्थापन, प्रशासन, न्याय व निवडणूक व्यवस्थेतील जटिल-कुटिल समस्या, राजकारणाचे गुन्हेगारीकरण व गुन्हेगारीचे राजकारण यांमुळे जनमानसाची

होणारी कोंडी या सर्वांचे चित्रण, सडेतोड वास्तवदर्शी विवेचन पुस्तकाच्या पूर्वार्धात आहे. उत्तरार्धात सामाजिक परिवर्तनासाठी उपलब्ध आशादायी केंद्रस्थानांचा ऊहापोह, सत्य बदलासाठी सज्जनशक्तीला आव्हान व आवाहन, चारित्र्यसंपन्न नेतृत्वाची गरज, गांधी व विनोबांच्या दृष्टिपथातला भारत साकारण्याची सद्भावना, त्यासाठी कृतिशील आराखडा यांचा परामर्श त्यात घेण्यात आला आहे.

सामाजिक व्याधींवर सुटसुटीत आणि दूरगामी उपाययोजना सुचविली आहे. उत्तम गिरी (जळगाव जामोद) या वाचकाने या पुस्तकावर लिहिले, "...हिंदवी स्वराज्य या गांधीजींनी लिहिलेल्या पुस्तकाच्या धर्तीवरच हे पुस्तक लिहिले गेले आहे, असे वाटते. हे पुस्तक सर्व आमदार, नामदार, खासदार या सर्वांनी वाचावे, चिंतन करावे, मनन करावे असेच आहे, इतके मुद्देसूद अभ्यासपूर्ण पुस्तक लिहिले आहे." लांबच्या पल्ल्याचा विचार करून सुचविलेल्या काही उपाययोजनांवर अंमलबजावणीही झाल्याचे दिसून येते. उदाहरणार्थ- माहितीचा अधिकार, निष्क्रिय लोकप्रतिनिधींना माघारी बोलावण्याचा अधिकार इत्यादी. एखाद्या पीएच्.डी.च्या प्रबंधाचे सारांशात्मक विवेचन असे स्वरूप या छोटेखानी पुस्तकाचे असल्याने यातील काही मुद्यांचे सविस्तर-सोदाहरण विवेचन असावे, अशी अपेक्षा अनेक वाचकांनी केली होती. सज्जनशक्तीच्या सक्रियतेबाबत विस्तृत लेखन भाऊंनी करावे, असाही सूर अनेकांच्या प्रतिक्रियांतून प्राप्त झाला. भाऊंनी यासंदर्भात काही आरेखनही केले होते.

### प्रत्येक विचार राष्ट्रहितैषी...

Leave this world better than you found it. हे मिशन भाऊंच्या आचरणात होते. लेखनात, भाषणात, मुलाखतीत या मिशनचे वारंवार उच्चारण होत असे. पुस्तकात जे लिहिले, भाषणात- मुलाखतीत जे सांगितले त्या- त्या विचारांचे दृढनिश्चयाने आचरण त्यांनी स्वतः केले. परिवाराला आणि सहकाऱ्यांना, सहवासात येणाऱ्या व्यक्तींना आगळ्यावेगळ्या कार्यसंस्कृतीने भाऊंनी संस्कारित केले. बोलके सुधारक आणि कर्ते सुधारक अशा दोन वर्गवारीत "कर्त्या सुधारकात" मोठ्याभाऊंचे नाव आदरपूर्वक समाविष्ट करावे लागते. भाऊंनी व्यक्त केलेले सुविचार त्यांच्या सुसंस्कृत व्यक्तिमत्त्वाचे दर्शन असायचेच; महत्त्वाचं म्हणजे तो विचार ते आधी कृतीत आणायचे. उद्योजकाच्या अंगभूत गुणकौशल्यांसोबत प्रज्ञा-प्रतिभेचे इतके तेजस्वी दर्शन अपवादात्मकच. त्यातही सामाजिक बांधिलकी, कृतज्ञता, सकारात्मक विचारांचा-भाषेचा प्रभाव, परिवर्तनशील विचारसरणी, दूरदृष्टीने केलेला विचार, प्रत्येक शब्दाच्या उच्चाराआधी हे विचार राष्ट्रहितैषी असायला हवेत, याबाबत केलेला काटेकोर विचार हे त्यांच्या व्यक्तिमत्त्वाचे आणि वाङ्मयाचे प्रधानवैशिष्ट्य आहे.

### जलतपस्वी... जलयोगी...

भाऊंच्या जीवनाचे वर्णन "थेंबभर पाणी अनंत आकाश" या यथायोग्य शब्दांत करता येईल. "जल हेचि जीवन" या शब्दांना भाऊंनी कृतिभक्तीची जोड दिली. उजाड टेकड्यांना हिरव्या बोलीचा ऋतुगंध देणाऱ्या या ध्येयवेड्या माणसाने भूमिपुत्रांच्या कल्याणाचा आयुष्यभर ध्यास घेतला. योग्य प्रमाणात, योग्य पद्धतीने पाणी पिकांपर्यंत पोहोचावे यासाठी काया-वाचा-मन मायमातीशी प्रामाणिक राहिले भाऊ. शेती, शेतकरी, पाणी हा अहोरात्र त्यांच्या ध्यासाचा विषय. त्यांच्या भाषणात, लेखनात, मुलाखतीत हेच विषय



असायचे. परंपरेतल्या सोन्याची, नव्यातल्या माणिकमोत्याची अचूक पारख असणाऱ्या द्रष्ट्या भाऊंनी पाण्याच्या वापराबाबत नवे कालभान दिले. भाऊंच्या साहित्यसृष्टीत भूमिपुत्रांच्या कल्याणाचा, पाण्याच्या व्यवस्थापनाचा विचार केंद्रस्थानी आहे. तहानलेल्याची तहान भागविणे, भूमीला धनधान्याने समृद्ध करणे, सातत्याने गतिमान राहणे, हा प्रवाही पाण्याचा गुणधर्म भाऊंच्या हृदयावर संस्कारित झाला होता. म्हणूनच नवतंत्राला आधुनिकतेशी विलक्षण शक्तिशाली स्त्रोतांसह भाऊंनी जोडले.




**ठिबक सिंचनाचे प्रणेते!**

भाऊंनी कठोर परिश्रमाने, प्रामाणिकपणाचे मूल्य सांभाळून शेतीमातीशी, माणुसकीच्या गहिऱ्या संवेदनेशी हृदय नाते जपणारे-जोपासणारे पर्यावरणपूरक प्रकल्प साकारले. या प्रकल्पांच्या उभारणीत घडलेल्या अनेक घटना-प्रसंगांतून जेही शिक्षण-प्रशिक्षण झाले, ते सर्वांसाठी पुस्तकांच्या माध्यमातून खुले करून दिले. "शहाणे करूनि सोडावे सकल जन" ही त्यामागील कळकळीची भूमिका. श्रद्धेय मोठेभाऊ एक जलयोगी, जलपूजक, जलसाधक, जलतपस्वी, जलपराशर होते. "थेंबथेंब पाणी जीवनात चैतन्य आणी" हे व्रत आचरणात आणणाऱ्या मोठ्याभाऊंनी जलबचतीबाबत हजारो-लाखो लोकांना जलसाक्षर केले. ठिबक सिंचन त्यातले एक महत्त्वपूर्ण आणि अतिशय परिणामकारक माध्यम. ठिबक सिंचनाचे तंत्रज्ञान भाऊंनी भारतात आणले. ठिबक सिंचनाचे प्रणेते असलेल्या भाऊंमुळे पन्नास लाखांच्या वर शेतकऱ्यांचे उत्पन्न वाढले. "ठिबक सिंचनाला एक यज्ञ म्हणून मी



माझ्या आयुष्यात स्वीकारले आहे..." हे भाऊंचे उद्गार यथार्थ आहेत. "जलसंधारण, जलसंवर्धन, जलसंग्रह, जलवितरण आणि मुख्य म्हणजे जलवापर, या बाबी समाजामध्ये अत्यंत संवेदनशील अशा मानल्या जाव्यात," भाऊंनी हे सर्व आधी केले, नंतर सांगितले, लाखो लोकांकडून करवूनही घेतले. भाऊंनी कष्टकरी शेतकऱ्यांच्या उज्ज्वल भवितव्यासाठी "कहाणी कष्टलाटांच्या पाणलोटाची" हे स्वअनुभवाधारित पुस्तक लिहिले. "कहाणी जलनियोजनाची, स्वप्नवेड्याच्या ध्येयपूर्तीची!" या शब्दांत या पुस्तकाचे वर्णन केले जाते. यातील "स्वप्नवेडा" शीर्षकाची डॉ. राजेंद्र मलोसे यांनी लिहिलेली कविता मुळातून वाचण्यासारखी आहे. या पुस्तकाचा इंग्रजी अनुवाद A Telling Tale शीर्षकान्वये प्रकाशित झाला आहे.

*अनुभूती स्कूलमधील विद्यार्थ्यांशी संवाद करताना मोठे भाऊ*



### सरस्वती अधिष्ठान... श्रमाधारित संस्कृतीची रुजवात...

अनुभूती इंटरनॅशनल रेसिडेन्शिअल स्कूलचे शैक्षणिक मूलतत्त्व लिहिताना. "Statement of Purpose'" या पुस्तकाची शास्त्रशुद्ध पद्धतीने भाऊंनी रचना केली. भाऊ म्हणायचे, "अनुभूती शाळेचा जर आत्मा पाहायचा असेल तर तुम्हाला माझी तीन तत्त्वं आहेत, ती समजून घेतली पाहिजेत. पहिलं तत्त्व-भारतीय संस्कृतीशी प्रबुद्ध आणि सुदृढ अशी बांधिलकी. दुसरं तत्त्व- सहकार्य आणि मिलनसार वृत्तीची जोपासना आणि तिसरं तत्त्व- सामाजिक आणि पर्यावरणिक बांधिलकी जपणारी उद्यमशीलता. समयसूचकता, भान कायम जागृत असणे, समतोलतेने निर्णय घेत राहणे, अशा अनेक बाबी म्हणजे शहाणपण..." "अनुभूती" च्या विद्यार्थ्यांकडून असणाऱ्या या अपेक्षाच त्या पुस्तकातून व्यक्त होतात.

'Letters To and From Dadaji' या पुस्तकात अनुभूती स्कूलच्या विद्यार्थ्यांशी आजोबा या नात्याने साधलेला पत्रसंवाद प्रकाशित झाला आहे. विद्यार्थ्यांनी अत्यंत सूक्ष्मातिसूक्ष्म स्तरावर कुतूहल म्हणून किंवा बऱ्याचदा चौकसबुद्धीने विचारलेल्या वैविध्यपूर्ण विषयांवरील प्रश्नांना अनुभवसंपन्न ज्ञानमहर्षींनी विद्यार्थ्यांना समजेल या भाषेत दिलेली उत्तरे मुळातून वाचण्यासारखी आहेत. दादाजी या नात्याने मनमोकळेपणाने दर रविवारी सुसंवाद साधला जात असे. त्यातून आजोबा आणि नातवंडातला जिव्हाळा निर्माण झाला. विद्यार्थ्यांना अशा माध्यमातून, पालकांना पालकसभांच्या माध्यमातून आणि शिक्षकांना विविध बैठकींच्या माध्यमातून मार्गदर्शन करणारे भाऊ "जगावं कसं" याचे जिवंत धडे देत होते. खरंतर या एकूणच चर्चा-संवादांचं संकलन वाचकांसाठी उपलब्ध होणं आवश्यक आहे.







'The Enlightend Entrepreneur' गांधीजींच्या विश्वस्त संकल्पनेवर आधारित उद्योजकतेबाबत भाऊंनी ऊहापोह केलेला एक महत्त्वाचा ग्रंथ याद्दष्टीने या ग्रंथाचा विचार करता येईल. 'An Entrepreneur Deciphered' या पुस्तकात भाऊंच्या इंग्रजीतील मुलाखती आणि लेखांचा समावेश करण्यात आला आहे. भाऊंच्या मुलाखतींची मराठीतून दोन पुस्तके प्रकाशित झाली असून, "उमलले संवाद भाग-1, भाग-2" या नावाने ही ग्रंथरचना परिचित आहे. ऑक्टोबर 1988 पासून ते 13 ऑगस्ट 2009 पर्यंतच्या एकूण 45 मुलाखती प्रकाशित झाल्या आहेत. अनुक्रमे सदाशिव अमरापूरकर आणि तत्कालीन महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळाचे अध्यक्ष मधुमंगेश कर्णिक यांची प्रस्तावना या ग्रंथांना लाभली आहे.

**प्रेरणास्थान अन् आधारस्तंभ...**

"...चतुरस्त्र, अष्टपैलू गुणी माणसाचे जीवन-उच्चार, आचारविचार, सृजनता-पुढच्या पिढीसाठी प्रेरणास्थान व आधारस्तंभ असते. त्यातल्या त्यात अशा व्यक्ती सामान्य परिस्थितीवर मात करून शून्यातून विश्व निर्माण करणाऱ्या असल्या, तर त्या सर्वसामान्यांना अधिक जवळच्या वाटतात. अशा व्यक्तींमध्ये सामावलेली प्रखर आकलनशक्ती, प्रदीर्घ धारणाशक्ती व तीक्ष्ण तर्कबुद्धी या भावी पिढ्यांना उद्यमशीलतेकडे जाण्यासाठी प्रेरणादायी ठरतात. अशा कर्तृत्ववान व्यक्तींच्या विविध पैलूंचे दर्शन वाचकांना व्हावे, हा ग्रंथ प्रकाशनामागचा हेतू संकलकांनी व्यक्त केला आहे. भवरलालजींच्या विचारांचं खतपाणी घालून या देशाला जागतिक महासत्ता बनविण्यासाठी नवभारताच्या चैतन्यमय, उद्यमशील, सत्त्वशील उभारणीसाठी संस्कारांची मुळं खोलवर रुजावीत, त्यांच्या विचारांचे वाचन, मनन, चिंतन व अनुकरण व्हावे आणि ते विचार सर्वसामान्यांपर्यंत पोहोचावेत," ही अपेक्षा व्यक्त करण्यात आली आहे.

### आधी चांगला माणूस व्हा...

श्री. अमरापूरकर या ग्रंथाबाबत साक्षेपाने नोंदवतात, "..लहान मुलांशी बोलताना भाऊ मोठा माणूस बनण्यापेक्षाही चांगला माणूस बनण्याला जास्त महत्त्व देतात." "उमलले संवाद"- भाग दोनचे संकलक आनंद गुप्ते आपले मत नोंदवताना म्हणतात, "सैद्धांतिक चर्चेतच गुंतून राहण्यापेक्षा वस्तुनिष्ठ उपाययोजना सुचवून त्यांच्या यशापयशाची कारणमीमांसा करणारा हा हाडाचा व्यवहारी माणूस विचारवंत म्हणून श्रेष्ठ त्यामुळेच होतो आणि हेच त्यांच्या मोठेपणाचे गमक होय". "जगातल्या सर्वांत श्रीमंत लोकांच्या यादीत माझे नाव येण्यापेक्षा जगातल्या सर्वांत सुखी लोकांच्या यादीत माझे नाव आले पाहिजे. नीतिमूल्यांच्या कार्यसंस्कृतीशी मी कोणत्याही प्रकारची तडजोड करणार नाही," मोठ्याभाऊंची ही सुस्पष्ट विचारधारा मधुमंगेश कर्णिकांनी ठसठशीतपणे अधोरेखित केली असून, "आदरणीय भाऊंच्या या संवादात्मक चिंतनाचा विशेषतः तरुण पिढीला उपयोग होईल. हे विचारांचे, संवादाचे उमलणे तरुणाईसाठी आहे. या देशाचे भवितव्य ज्या पिढीच्या हाती आहे, तिच्यासाठी एका कर्मयोग्याने दिलेला हा प्रसाद आहे, असे मानून तरुणांनी त्याचा स्वीकार केला पाहिजे. तरुणांबरोबर शेतकरी, उद्योजक, आर्थिक क्षेत्रात काम करणारे, विज्ञाननिष्ठ नागरिक, महिला, शासनातील राज्यकर्ते व सनदी अधिकारी या सर्वांनी भाऊंच्या या विचारधनाचा स्वतःसाठी उपयोग करावा. बँकेतील धन फक्त या आयुष्यात उपयोगी पडेल, विचारधन शाश्वत असल्याने ते कित्येक भावी आयुष्यांसाठी प्रेरक, मार्गदर्शक आणि उपयुक्त ठरेल. भाऊंनी महात्मा गांधी, पंडित जवाहरलालजी आणि जे. आर. डी. टाटा यांच्याकडून हे विचार-आचारधन घेतले व त्याचा आयुष्यभर सदुपयोग केला. भाऊंच्या या कृतिशील विचारधनाचा नव्या पिढीने लाभ घ्यावा." श्री. कर्णिकांचा हा अभिप्राय भाऊंच्या समग्र साहित्याबाबतचाच आहे, हे अभिमानपूर्वक सांगावेसे वाटते.

### वाचनसंस्कृतीचे विनम्र उपासक!

"साने गुरुजींच्या "श्यामची आई" या भावस्पर्शी पुस्तकाचा सर्वाधिक प्रभाव बालपणापासून माझ्यावर आहे," भाऊ नेहमी म्हणत. शालेय जडणघडणीत ज्ञानपीठ पुरस्कार विजेत्या वि. स. खांडेकरांचे साहित्य भाऊंनी वाचले. त्यांना खांडेकरांचे साहित्य खूप आवडायचे, तसा उल्लेख त्यांनी आठवणीने केला आहे. "कलेसाठी कला की जीवनासाठी कला" या खांडेकर, फडकेंच्या वादातही ते गुरफटल्याचे मान्य करतात. पंडित जवाहरलाल नेहरूंच्या लिखाणानेही भाऊ भारावले. महात्मा गांधीजींचेही साहित्य भाऊंनी








वाचले होते. स्वातंत्र्यवीर वि. दा. सावरकरांच्या "ने मजसी ने परत मातृभूमीला, सागरा प्राण तळमळला," या गीताच्या आठवणीने भाऊ गहिवरून जात असत. व्यवस्थापन क्षेत्रातल्या कर्तबगार व्यक्तींचे साहित्य वाचणाऱ्या, त्या साहित्याची अभ्यासपूर्ण टिपणे काढणाऱ्या भाऊंना कष्टाचे महत्त्व पटवून देणाऱ्या बहिणाबाई चौधरींच्या काव्यपंक्ती "आधी हाताला चटके, तेव्हा मिळते भाकर," चटकन आठवत असे. खेड्यातील ग्रामीण जगण्याचे यथार्थ चित्रण करणाऱ्या कविवर्य ना. धों. महानोरांच्या पुढील काव्यपंक्ती भाऊ मुलाखतीत, भाषणात आठवणीने उद्धृत करीत असत.

**आम्ही या खेड्यात जन्मलो, दुःखाची गाथा**

**या खेड्यात पांग फेडण्या उन्नत हा माथा...**

**दुःख, दैन्य अन् दारिद्र्यातील शेतकरी माझा**

**जुन्या पुराण्या शेतीमधला रुतलेला फासा...**

भाऊंना आवडलेले लेखक, कवी, विचारवंत, व्यवस्थापक, समाजसेवक, वक्ते आणि भाऊंना आवडलेल्या साहित्यकृती, भाऊंचे वाचन, भाऊंचे वाचनसंस्कृतीबाबत असणारे विचार, व्यासंग, अभ्यासाची पद्धत एकूणच हा सर्व विषय एका स्वतंत्र ग्रंथाचा विषय आहे.

## वक्ता दशसहस्त्रेषु!

भाऊंच्या 58 भाषणांचे संकलन असलेली दोन पुस्तके प्रकाशित असून, "जैन हिल्सवरील जागरण भाग-1 आणि भाग-2" या शीर्षकान्वये ही पुस्तके सर्वश्रुत आहेत. "जैन हिल्सवरील जागरण भाग-3" हेही पुस्तक लवकरच प्रकाशित होणार असून, त्यात 28 भाषणे आहेत. साधारणतः 2004 पासून 2016 पर्यंतची निवडक भाषणे या संकलनात समाविष्ट आहेत. अतिशय महत्त्वपूर्ण बाब म्हणजे मोठ्याभाऊंची दीडशेच्या वर भाषणे ऑडिओस्वरूपात, काही ऑडिओ- व्हिडीओस्वरूपात प्रकाशन विभागाकडे उपलब्ध आहेत. त्यात शंभराच्या वर मराठी, काही हिंदी, इंग्रजीही आहेत. "जैन हिल्सवरील जागरण भाग-एक" पुस्तकावर संपादकीय संस्कार ज्येष्ठ विचारवंत आणि संपादक दिनकर गांगल यांनी केले असून, त्यांची प्रस्तावना या पुस्तकाला लाभली आहे. भाऊंच्या पुस्तकांना लाभलेल्या प्रस्तावना अतिशय अभ्यासपूर्ण, आशय-विषयाचे मर्म समजावून सांगणाऱ्या आहेत.




श्री. गांगल यांची प्रस्तावना मला व्यक्तिशः खूपच भावलेली आहे. त्यांच्या अप्रतिम प्रस्तावनेतील अनेक महत्त्वपूर्ण मुद्यांना अधोरेखित करण्याची मनोभावे इच्छा होते आहे; परंतु पृष्ठमर्यादेचे बंधन असल्याने काही जागांचा उल्लेख करणार आहे.

### भावना व्यवहार देखील तर्कबुद्धीने युक्त...

भाऊंच्या जडणघडणीचा, व्यक्तिमत्त्वाचा सूक्ष्मातिसूक्ष्म बारकाव्यानिशी शोध आणि वेध घेताना दिनकर गांगल म्हणतात, "...प्रत्येक निर्णय, प्रत्येक कृती हे जाणीवपूर्वक घडून आलेली आहे. त्यांचा भावनाव्यवहारदेखील तर्कबुद्धीने युक्त आहे. तरी त्यातील भावनांची ऊब जाणवावी एवढा तो जिव्हाळ्याने भरलेला असतो. म्हणजे तो भावविवशतेपेक्षा संवेदनक्षमतेच्या अंगाने जाणारा आहे. त्यासंदर्भात त्यांच्या विवाहाची "ती आणि मी" या पुस्तकातील कहाणी जरूर वाचावी. भवरलाल जीवन जसे समोर येईल तशी वळणे घेत जगत गेले नाहीत. त्यांनी स्वतःचे जीवन घडविले, त्याची प्रत्येक टप्प्यावर चिकित्सा केली आणि पुढचा पल्ला गाठला. त्या- त्या वेळचे मंथन-चिंतन आणि त्यासाठी जरूर तेवढा वाचन-श्रवणादि अभ्यासही भवरलाल यांची ताकद आहे. त्यांनी ती मल्लाप्रमाणे कमावलेली जाणवते. त्यामुळे त्यांची प्रज्ञा-प्रतिभा चतुरस्त्र संचार लीलया करू शकते; त्यास अध्ययनाची जोड सतत असतेच... उद्योगसाम्राज्यापलीकडे विचारचिंतक, वक्ता, जिज्ञासू, शहाणा माणूस म्हणून पाहत होतो. त्यांची बुद्धी प्रगल्भ आहे, त्यांना अनुभव अफाट आहे, त्यांचे वाचन चोखंदळ आहे. ते सारे त्यांच्या बोलण्यामधून, भाषणांमधून, मुलाखतींमधून व्यक्त होते. भाऊंची कथनशैली सुसंवादी असून, वक्त्यामधील सकारात्मकता, कृतिशीलता श्रोत्यांपर्यंत थेट पोहोचते."

"पुस्तके ही केवळ विकण्याची वा विकत घेण्याची छापील पाने नव्हेत; ती समाजसंस्कृतीची प्रेरणातीर्थे असतात..." या शब्दांत पुस्तकांचा गौरव करणाऱ्या भाऊंची भाषणे मुळातूनच वाचायला हवीत. सज्जनशक्ती, शासनाबाबतची स्पष्ट मते, एक कपभर






चहा घेण्यासाठी 1180 लोकांचा हातभार लागतो, याबाबत आइन्स्टाइनने केलेला अभ्यास भाऊंनी समाजऋणाबाबत दिलेले हे उदाहरण, स्वतःवर जो विजय मिळवितो त्याला "महावीर" म्हणतात, हा नियंत्रण मिळविण्याबाबत काढलेला निष्कर्ष, हिंसा-अहिंसा, महात्मा गांधी यांच्या कार्याबाबत विचारसूत्रे, स्त्रियांच्याच हातात ग्रामपंचायतींचा कारभार देणे का उचित आहे याबाबत मांडलेली सुस्पष्ट भूमिका, विज्ञानाला विवेकाची जोड का आवश्यक, काळ फार झपाट्याने बदलतो "नवे बदल स्वीकारा" याबाबत नव्या पिढीला दिलेले भान, यशस्वी जीवनाचे गमक उद्दिष्ट, दिशा आणि मार्ग, बिटर, बेटर आणि बार्टर... जीवन जगण्याच्या या तीन पद्धती, इंग्रजांचा आपल्या संस्कृतीवर-शिक्षणपद्धतीवर, आचारविचार, आहार एकूणच जीवनशैलीवर असलेला पिढ्यान्पिढ्या प्रभाव कसा आहे आणि मूळ भारतीय माणूस, त्याच्या सवयी आपल्या संस्कृतीनुसार कशा होत्या, हे नाशिक येथे भरविलेल्या प्रदर्शनात उद्घाटक या नात्याने केलेल्या भाषणात वाचायला मिळते. भाऊ पहिल्यांदा यू. एस.ला गेले होते, त्यावेळी भाऊंना त्यांच्या मित्राने "टेबल मॅनर्स आणि एटिकेटस्" यासंदर्भातले पुस्तक दिले होते. मुळातूनच हा विषय जिज्ञासू वाचकांनी अवश्य पाहावा.

नाशिक येथे भरलेल्या अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनातील "उद्योजक साहित्य" हे भाषण भाऊंच्या "श्रमातून झिरपणाऱ्या आनंदासाठी काम करूया!" या कार्यसंस्कृतीचे दर्शन घडविणारे आहे. भाऊंची सर्वांत प्रिय प्रार्थना म्हणजे, "मेरी भावना". केकी मूस फोटोग्राफी व पारितोषिक वितरणानिमित्त दिलेल्या भाषणात भाऊ सुरवातीला ही प्रार्थना सादर करतात :

**गुणी जनों को देख हृदय में प्रेम उमड आवे, उनकी सेवा में मन मेरा मग्न हो जावे ।**

भाऊंच्या या आध्यात्मिक वाणीने श्रोते भारावले नसतील तरच नवल! ज्येष्ठ नागरिक संघाच्या स्नेहमेळाव्यानिमित्त दिलेल्या भाषणात भाऊ "आनंदवन"च्या श्रमर्षी बाबा आमटे यांचे आदर्श उदाहरण आठवणीने देतात. भाऊंच्या काही भाषणांत गोष्टींचाही समावेश आहे. महत्त्वपूर्ण मूल्यविचार श्रोत्यांच्या अंतःकरणात खोलवर ठसविण्यासाठी भाऊंनी विचारपूर्वक निवडलेली गोष्ट निश्चितच परिणामकारक ठरत असे. अंधश्रद्धा निर्मूलन समितीच्या विचारपीठावरून "विज्ञान आणि अध्यात्म" यांचा सुगम समन्वय कसा होऊ शकतो, याबाबत अभ्यासपूर्ण केलेले भाषण वाचण्यासारखे आहे. "भावना आणि बेचैनी" या भाषणात कंपनीवर कोसळलेल्या भयानक आपत्तीप्रसंगी मोठ्याभाऊंनी अनिलभाऊंना धैर्याने लढण्याचा दिलेला संदेश ती घटना मुळातूनच वाचण्यासारखी. सवयी आणि चारित्र्य याबाबत एका प्रसिद्ध तत्त्ववेत्त्याचे वचन भाऊ नेहमी सांगत असत :

**तुमच्या शब्दांकडे पाहा; ते तुमचे विचार असतील,**
**तुमच्या विचारांकडे पाहा; त्या तुमच्या सवयी होतील,**
**तुमच्या सवयींकडे पाहा; ते तुमचे गुणधर्म किंवा चारित्र्य दर्शवतील,**
**तुमचे चारित्र्य पाहा; तीच तुमची नियती ठरेल...!**

### "पॉवर ऑफ पॉझिटिव्ह टॉक"

हायड्रोपोनिक्स तंत्राद्वारे तयार केलेला भाजीपाला डॉ.एपीजे अब्दुल कलाम यांना दाखवितांना भवरलाल जैन शेजारी अनिल काकोडकर



मोठ्याभाऊंना भारताचे माजी राष्ट्रपती डॉ. ए. पी. जे. अब्दुल कलाम यांच्याविषयी नितांत आदर होता. डॉ. कलाम यांच्या "पॉवर ऑफ पॉझिटिव्ह टॉक" बाबत भाऊंनी सांगितलेली गोष्ट आणि दिलेला संदेश सर्वांसाठी अनुकरणीय. "विषारी शब्दांची कोशातून कायमची हकालपट्टी करणे आवश्यक आहे. उदाहरणार्थ- "परंतु" हा शब्द ऐकल्यानंतर आधी केलेल्या कामावर विरजण टाकून संबंधित व्यक्ती शंका निर्माण करीत आहे की काय? असेच आपल्याला वाटते. "किंतु-परंतु-जर-तर" हे शब्द यशाबद्दल शंका बळावणारे आहेत. ते कधीही उच्चारू नयेत. काही माणसे नेहमी म्हणतात, "मी प्रयत्न करतो," यातील "प्रयत्न करतो" हे शब्द अपयशाचा आरंभ स्पष्ट करतात. "कदाचित घडू शकले असते, करू शकलो असतो, करणे आवश्यक आहे, करू शकत नाही," असे शब्द कामाबाबत गांभीर्य नसणाऱ्या व्यक्तीच उच्चारताना दिसतात. जबाबदार व्यक्ती कायम सकारात्मक शब्दांचा वापर करून आपला आत्मविश्वास, आपले मनोधैर्य निरंतर टिकवून ठेवतात. एवढे सांगून भाऊ थांबले नाहीत. भाऊंनी प्रत्येक सहकाऱ्याच्या हाती "संस्थामूल्य अधिष्ठान" (Corporate Philosophy) माहितीपत्रक दिले. त्यात "असे बोललात म्हणजे - अशी वृत्ती दिसून येते, असे सकारात्मक बोला - त्यामुळे हे गुण दिसतात." याबाबत सहकाऱ्यांकडून वारंवार उच्चारल्या जाणाऱ्या 42 उद्गारांचा समावेश केला आहे.

न सोडी जिद्द जो कार्याची। तया नसे जाण तणावाची।

उदात्तपणा बाळगी अंगाशी। पाही पहाट तो यशाची॥

"आपण कामामध्ये सतत मग्न राहणार असाल आणि प्रत्येक काम जिद्दीने पूर्ण करण्यासाठी सिद्ध असाल, तर आपल्याला तणाव येण्याचा प्रश्नच निर्माण होणार नाही," हे वचन लक्षात ठेवण्यासारखे आहे. आपण भारतीय आहोत, याचा नितांत अभिमान भाऊंच्या संवादातून वारंवार व्यक्त होतो. बौद्धिक संपदा आणि कृषी ही भारताची सर्वांत मोठी शक्तिस्थाने आहेत, याची जाणीव भाऊ करून देतात. जगप्रसिद्ध तत्त्ववेत्ता मॅक्सम्युल्लर आणि महान शास्त्रज्ञ, गणितज्ज्ञ आइन्स्टाइनचे यासंदर्भातले सकारात्मक भाष्य भाऊ कथन करायचे.



© **जैन इरिगेशन सिस्टिम्स् लि.,** जळगाव.

श्रमातून झिरपणाऱ्या आत्मानंदासाठी श्रमूया

**संस्था मूल्य अधिष्ठान (Corporate Philosophy)**

**श्रद्धा-भाव (Credo)**
न सोडी जो जिद्द कार्याची। तया नसे जाण तणावाची॥
उदात्तपणा बाळगी अंगाशी। पाही पहाट तो यशाची॥

**जीवन-लक्ष्य (Mission)**
सार्थक करुया जन्माचे। रूप पालटू वसुंधरेचे॥

**भविष्य-वेध (Vision)**
देशी विदेशी जे जे करू। तयामध्ये अग्रगण्यता संपादू॥

**मार्गदर्शक-सूत्र (Guiding Principle)**
संस्था मूल्य अधिष्ठानाला मूर्तस्वरूप देण्याकरिता समाजाची बांधिलकी मानून व पर्यावरणाची जाण ठेवून आम्ही सहकारी, साधनसामुग्री आणि संपत्ती यांचा कार्यक्षमतेने व अत्यंत काटकसरीने वापर करू.

**ध्येय-धोरण (Goal)**
दर्जेदार उत्पादनाची निर्मिती करून माफक किंमतीत त्याची विक्री करावयाची, जेणेकरून ग्राहकाचे समाधान, आधार स्तंभांना न्याय्य लाभ मिळू शकेल व नाविन्याची कास धरून सातत्याने विकास साधता येईल.

**कार्य-संस्कृति (Work Culture)**
कर्म हेचि जीवन !



*जळगावच्या बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठाने भवरलाल जैन यांना दिलेली सन्माननीय डी.लिट ही पदवी कुलगुरू डॉ. आर.एस. माळी प्रदान करताना. शेजारी राष्ट्रपती सौ. प्रतिभाताई पाटील व इतर मान्यवर*

**समाजहितैषी कार्यासाठी जगायचं...**

"तिसऱ्या महायुद्धाचे कारण पाणी असेल," सद्यःस्थितीचा सर्वदृष्ट्या विचार करून भाऊंनी भविष्यदर्शी सांगितलेलं हे वचन सर्वांना जागं करणारं आहे. भाऊ एका भाषणात परखडपणे म्हणतात : "...वाईट बोलू नये; पण कटुसत्याकडे दुर्लक्षही करू नये. काही वर्षांनी साखर मिळणार नाही, तेल मिळणार नाही, गहू मिळणार नाही. आज तर फक्त डिझेल मिळत नाही. या सर्व गोष्टी भविष्यात मिळणार नाहीत, त्यावेळी परत आपल्याला पीएल 480, यलो-मिलो ज्वारीचे दिवस येतील, त्यावेळी सर्वांना शेतीचे महत्त्व समजेल! मी कॉम्प्युटरच्या विरोधात नाही; पण अग्रक्रम शेतीला, नंतर कॉम्प्युटरला. सॉफ्टवेअरमधून ज्वारी बाहेर पडली, असे अजून तरी मी काही ऐकलेले नाही. त्यामुळे कॉम्प्युटरची गरज जास्त आहे की ज्वारी आणि गव्हाची, हे आपण आता ठरवावे." पाणी या मूलभूत गरजेबाबत भाऊ कळकळीने म्हणाले होते, "... कमीत कमी चार कोटी लोक चांगल्या पाण्यापासून वंचित आहेत. आपण जर असे उद्दिष्ट बाळगले, की घरोघरी वीस पैसे लिटरप्रमाणे बिसलरीसारखी व्यवस्था करता येईल का? आपण अशा समाजहितैषी कार्यासाठी आयुष्य वेचायचे ठरविले तर ते काम अधिक महत्त्वपूर्ण ठरणार नाही का?" भाऊंचा वसा आणि वारसा संस्कारित झालेल्या जैन परिवाराद्वारे आणि सहकाऱ्यांच्या माध्यमातून भाऊंचे स्वप्न पूर्ण करण्याचे उद्दिष्ट ठरविण्यात आले असून, त्याबाबत कृतिशील आराखड्याची रचनाही सुरू झाली आहे.



### मला भावलेल्या व्यक्ती

"जागरण भाग-2" या भाषणांच्या पुस्तकात विविध क्षेत्रांतील कर्तबगार व्यक्तींच्या सत्कार्याबाबतच्या प्रेरणादायी नोंदी आढळतात. यात भाऊंनी "मला भावलेल्या व्यक्ती" या भाषणात आई गौराई, दलूभाऊ, फेंड- फिलॉसॉफर अ‍ॅण्ड गाइड बडी हांडा यांच्याबाबतीत मांडलेले कृतज्ञतापर विचार प्रेरणादायी आहेत. महात्मा गांधी, (स्व.) प्रकाशभाई मोहाडीकर, डॉ. अविनाश आचार्य, (स्व.) जी. एच. नाईक, (स्व.) आप्पासाहेब पवार, श्री. डी. आर. मेहता, कविवर्य ना. धों. महानोर, रॅमन मॅगसेसे पुरस्कारप्राप्त बहादरपूरच्या नीलिमा मिश्रा इत्यादी व्यक्तिमत्त्वांवरील व इतरही भाषणे वाचकांनी जरूर पाहावीत. उत्तर महाराष्ट्र विद्यापीठाद्वारे मोठ्याभाऊंना "डी. लिट" पदवीचा सन्मान प्राप्त झाला. 28 जानेवारी 2006 ला भाऊंनी विद्यापीठात दिलेले भाषण "झालेल्या चुका आणि त्यातून गवसलेली दिशा" जिज्ञासूंनी अवश्य वाचावे.

### जन्मभूमीचे ऋण फेडण्याचा संस्कार...

अजिंठ्याच्या पायथ्याशी असलेल्या जळगाव जिल्ह्यातील वाकोद हे भाऊंचे जन्मगाव. भाऊंनी वाकोद या जन्मभूमीविषयी आयुष्यभर कृतज्ञता बाळगली. वाकोदवासीयांप्रती भाऊंच्या मनात अपार वत्सलभाव असे. वाढत्या व्यापातून आणि वाढत्या वयाच्या अनेक आरोग्यविषयक समस्या सांभाळून भाऊ वर्षातून दोनदा तरी वाकोदला जात असत. भाऊंनी आपल्या जन्मभूमीच्या सर्वांगीण परिवर्तनासाठी विलक्षण कष्ट घेतले. आर्थिक वाटाही भरभक्कमपणे खर्च केला.

एका सर्वोदयी ग्रामदानी युवक कार्यकर्त्यांच्या शिबिरात मार्गदर्शन करताना भाऊ म्हणाले होते, "...माझी सगळ्या गांधीवादी संस्थांना, विचारवंतांना, सेवकांना विनंती आहे, की निदानपक्षी आपण सगळ्यांनी एकत्र येऊन गांधीजींना हवे होते, ते सगळे एका गावात तरी करून दाखवावे, ते गाव म्हणजे वाकोद असावे, असे मला वाटते!" वाकोदला दरवर्षी होणाऱ्या ग्रामसभांमधील भाऊंनी केलेल्या भाषणांचे संकलन म्हणजे "एक न संपणारा प्रवास, ग्रामीण विकास!" यात सलग भाषणांचा संग्रह न करता भाऊंनी वाकोदच्या सर्वांगीण विकासासाठी जी ध्येय-उद्दिष्टे डोळ्यांसमोर ठेवली होती, त्या ध्येय-उद्दिष्टांनुसार त्या- त्या क्षेत्रात गावकऱ्यांच्या सहकार्यासह अन् सहकार्याशिवाय जी गुणवत्ता प्राप्त करता आली, त्या गुणवत्तेचे, यश-अपयश-पुन्हा यश याचे हे प्रांजळ दर्शन आहे. मात्र, या भाषणांमध्ये अनेकदा जाणवणारा भाऊंचा परखडपणा, कणखरपणा हा तर त्यांचा स्थायीभावच होता. अधोरेखित करावी अशी बाब म्हणजे आंतरराष्ट्रीय स्तरावर गौरवान्वित झालेल्या






"हिवरेबाजार" गावाच्या सरपंचांनी श्री. पोपटराव पवारांनी या ग्रंथाला प्रस्तावना लिहिली आहे.

### कार्य आणि कर्तृत्व

"वाकोदचा वटवृक्ष" हे 2006 मध्ये प्रकाशित झालेलं पुस्तक. वेगवेगळ्या वेळी-वेगवेगळ्या वर्षात- वेगवेगळ्या व्यक्तींनी भाऊंना भेटून त्यांच्या मुलाखती घेऊन किंवा त्यांच्या कार्याची माहिती गोळा करून लिहिलेले लेख यात समाविष्ट आहेत. या पुस्तकाला आंतरराष्ट्रीय ख्यातीचे जलतज्ज्ञ डॉ. माधवराव चितळे यांची प्रस्तावना लाभली आहे. भाऊंच्या उद्योजकीय क्षेत्रातील कर्तबगारीचा आलेख या पुस्तकात छायाचित्रांसह रेखाटला आहे. अफाट कर्तृत्व, कल्पकता, धडाडी, समयसूचकता, काळाची स्पर्धा, वास्तवतेचे भान आणि भविष्याचा वेध या साऱ्या गोष्टींचा सुरेख संगम म्हणजे मोठेभाऊ! या ग्रंथातील विविध लेखांत या कार्यकर्तृत्वाचे शब्दचित्रण आहे. अवघ्या आठ शब्दांत 2002 मध्ये भाऊंविषयी लिहिलेला एक विलक्षण अभिप्राय लक्ष वेधून घेतो. सयाजी शिंदे हा फार मोठा कलावंत. भाऊंविषयी म्हणतो, "जगण्यासाठी प्रेरणा देणारं आहे हे सगळं यांचं जगणं."

आज भारतभर स्वच्छता मोहीम जोरदारपणे राबविली जाते आहे. भाऊंची स्वच्छताप्रियता आणि त्याबाबत स्वतःच्या आहारविहाराबाबत






वाकोद येथे गावकऱ्यांशी संवाद साधतांना भवरलाल जैन

शिस्तबद्ध आचरण, आदर्श सवयी हे सर्व याच पुस्तकात भाऊंचे जिवलग मित्र आनंद गुप्ते यांनी लिहिलेला "चंदनाचं झाड..." लेख वाचण्यासारखा आहे. याच लेखात भाऊंच्या पुस्तक वाचन-व्यासंगाचा आणि विविध शब्दकोशांचा वापर करण्याच्या अभ्यासूवृत्तीवर मनोज्ञ प्रकाशझोत टाकला आहे. भाऊंचे जवळचे मित्र सुंदरलालजी मल्हारा यांनीही भाऊंच्या या सृजनशील सत्कार्याचा मर्मस्पर्शी वेध त्यांच्या लेखात घेतला आहे. 26 नोव्हेंबर 1998 ला "इकॉनॉमिक टाइम्स" मध्ये प्रकाशित झालेली "मी दुःखी आहे, मला आनंद आहे..., मला पूर्ण विश्वास आहे..." ही जाहिरात मुळातून वाचकांनी वाचावी. 15 मार्च 2000 ला भाऊंनी जैन इरिगेशनच्या वितरकांना उद्देशून "ग्रहण सरले" हे पत्र लिहिले. त्या पत्राचे काही अंश आणि "ग्रहण सुटले" हे पत्र आपल्या संवेदनशील मनाला स्पर्शून जाते. “सुरेखाताई, एकदा उखळात डोके घातले की घाव मोजायचे नसतात. एकदा काम हाती घेतले की त्यात कसलेही अडथळे येवोत, ते काम पूर्ण करायचे असते.” भाऊ ज्या सुरेखाताई शहांना उद्देशून म्हणाले, त्यांचा "किमयागार" शीर्षकान्वये लेख या पुस्तकात प्रकाशित झाला असून, शहाताईंनी "थेंबभर पाणी अनंत आकाश" ही चरित्रात्मक कादंबरी भाऊंच्या कार्यकर्तृत्वावर लिहिली आणि याच हृद्यंगम कादंबरीवर आधारित किशोर वयोगटातील विद्यार्थ्यांकरिता प्रेरणादायी ठरेल, समज-उमज वाढविणारे ठरेल, असे "थेंबाचे झाले मोती" हे छोटेखानी पुस्तकही सुरेखाताई शहा यांनी लिहिले.

### "आई तू गेलीस...?"

"वाघूरचं पाणी" 2006 मध्ये प्रकाशित झालेलं पुस्तक. प्रा. केशव मेश्राम यांची प्रस्तावना या पुस्तकाला लाभली आहे. प्रस्तुत पुस्तकाचे पाच मुख्य भाग केले आहेत. जन्मभूमीचा हुंकार, साहित्यरचनांवरील निवडक प्रतिक्रिया. विशिष्ट प्रसंग व पडसाद. बोल धुरंधर देशी-विदेशी मान्यवरांचे, मित्रमंडळींच्या चष्म्यातून... असे हे पाच भाग आहेत. 3 ऑक्टोबर 1996 ला मोठ्याभाऊंच्या मातोश्री गौराई स्वर्गवासी झाल्या. त्यावेळी "आई तू गेलीस?" या शीर्षकान्वये मोठ्याभाऊंनी लिहिलेली श्रद्धांजली वर्तमानपत्रात प्रकाशित झाली. मराठी साहित्यातील हे एक उच्च दर्जाचे आणि अत्यंत भावस्पर्शी असे साहित्य असल्याचा अभिप्राय अनेक मान्यवरांनी दिला आहे.




**आईच्या दुःखाचं डोळाभर पाणी, दाटली कहाणी आयुष्याची,**
**जात्याच्या ओवीचा संपला वेदांत, देव्हाऱ्यात वात करपली,**
**आमुच्या संसारी घोटाळो न मन, तिथे तरी प्राण शांत राहो...**
**- भवरलाल**

श्रद्धांजलीच्या या सांगतेपर्यंत येता- येता डोळे भरून येतात आणि कंठ दाटून येतो. भाऊंच्या या श्रद्धांजलीपर पत्राला महाराष्ट्रभरातून खूपच संवेदनशील प्रतिसाद लाभला. भाऊंना आलेले हृदयविकाराचे झटके आणि त्यावेळी केलेले इलाज हे सर्वकाही शहारून टाकणारे विषय. क्रॉफर्डरीड अॅवॉर्ड असो वा वाढदिवसाचा प्रसंग इत्यादी विषय मुळातून वाचण्यासारखे...

### "वात्सल्यपूर्ती" आणि परिवार

सहा सप्टेंबर 2005 ला मोठ्याभाऊंच्या सौभाग्यवती कांताबाई अनंतात विलीन झाल्या. त्यावेळी "जग आधी होतं तसं परत कधीही होणार नाही. ही भावना मनी घट्ट वास करते," हे भाऊंचे वाक्य हृदय पिळवटून टाकते. "ती आणि मी" पुस्तक लिहायचंच हा ध्यास भाऊंनी तेव्हापासून घेतला असावा, हे निश्चित. कांताईंच्या स्वर्गवासानंतर जैन परिवाराने प्रकाशित केलेला "वात्सल्यपूर्ती" ग्रंथ सचित्रगाथा आहे. यातील एकेक छायाचित्र पाहताना, आठवणी, मनोगते वाचताना संवेदनशील माणसाच्या

डोळ्यांना धारा लागतात. "वाघूरचं पाणी" पुस्तकातील आनंद गुप्ते यांचा "भाग्यवान कोण? आजोबा की नातवंडं?" हा लेख प्रत्येक कुटुंबात केवळ वाचावाच असं नाही, तर त्याची पारायणं व्हावीत, असा आहे. स्वतःच्या जगण्यासाठी एक नवी ऊर्जा त्यातून प्राप्त करून घ्यावी, असा आहे.




### इतर ग्रंथसंपदा

"पाषाणातून पाझर" या पुस्तकात मोठ्याभाऊंच्या कर्तृत्वाविषयी, गुणसंपदेविषयी रचलेल्या कवितांचे संकलन केलेले असून, "जळगावरत्न" या विशेषांकात भाऊंना जळगाव महापालिकेच्या वतीने प्राप्त झालेल्या "जळगावरत्न" पुरस्कारानिमित्त भाऊंच्या जगविख्यात कार्यकर्तृत्वासोबत खानदेशसाठी केलेल्या कार्याचा वेध अनेक मान्यवरांनी घेतला, ती भाषणे प्रकाशित करण्यात आली आहेत. "सुजलाम्- सुफलाम्" हे चिंतामणी नांदेडकरांनी लिहिलेले पुस्तक जैन उद्योगसमूहाच्या प्रकल्प परिसराबाबत, प्रकल्पांबाबत ललितरम्य शब्दवेध या स्वरूपाचे आहे. भाऊंच्या बहुश्रुत व्यक्तिमत्त्वाला विविध गुणधर्मासह शब्दांकित केले असून, या पुस्तकातील निसर्गसृष्टीचा संदर्भ रेखाटताना विविध कवितांची लालित्यपूर्ण पेरणी केली आहे. प्रस्तुत पुस्तक त्यामुळे खूपच आकर्षक झाले आहे. "मरुभूमीतून बाहेर" या ग्रंथाच्या निमित्ताने डॉ. श्रीनिवास साठे यांनी मोठ्याभाऊंच्या घराण्याचा पूर्व-इतिहास सविस्तर सांगितला आहे. 869 वर्षांचा 31 पिढ्यांचा हा इतिहास आहे. "महाराष्ट्रातल्या जळगाव जिल्ह्यातील जामनेर तालुक्यातील वडाळी या गावी बारा बलुतेदारांसह 24 नोव्हेंबर 1895 ला 50 रुपये रोख घेऊन भाऊंचे पणजोबा जवारमलजी आणि त्यांचे मोठे बंधू छोटमलजी स्थलांतरित झाले, ते कायमचे," असे संदर्भ लक्ष वेधून घेतात. भाऊंच्या जन्मापर्यंत नोंदविलेला हा इतिहास अभ्यासकांसाठी उपलब्ध आहे.




'Then & Now' या ग्रंथात जैन हिल्सचे पूर्वीचे रूप आणि आजचे स्वरूप सचित्र आणि महत्त्वपूर्ण नोंदींसह दिले आहे. Awards & Accolades या सचित्र ग्रंथात 2011 पर्यंत जैन इरिगेशन कंपनीला आणि मोठ्या भाऊंना प्राप्त झालेले सन्मान-पुरस्कार नमूद केले आहेत. "अतिथी देवो भव" या ग्रंथात जैन इरिगेशन कंपनीच्या विविध प्रकल्पांना तसेच अनुभूती स्कूल, वाकोद फार्म, गांधी रिसर्च फाउंडेशनला भेट देणाऱ्या अतिथींचे अभिप्राय दिले असून, छायाचित्रांसह देखण्या स्वरूपात हा ग्रंथ प्रकाशित झाला आहे.







*सौ. विजया राजाध्यक्ष आणि भवरलाल जैन ती आणि मी या पुस्तक प्रकाशन समारंभाप्रसंगी*

### अनुभवसंपन्न प्रकाशकिरणे...

"मुरलेलं लोणचं" आणि नुकतेच प्रकाशित झालेले "जीवनातील शाश्वत मूल्य" ही मोठ्याभाऊंच्या कोटेशनची दोन पुस्तके आहेत. मोठ्याभाऊंनी शुकदास यांचे अर्पण पत्रिकेत उद्धृत केलेले वचन असे आहे : "विचार हे चलनातील नाण्यासारखे असतात. त्यावर कोणाचीच मालकी नाही, तरीपण माझे म्हणून घेता येतात. दुसऱ्याला देता येतात आणि संग्रहीसुद्धा ठेवता येतात." भाऊंच्या भाषणातून- संभाषणातून- लेखनातून मिळालेल्या अनमोल सुभाषितांचा, मौलिक विचारांचा हा समृद्ध ज्ञानठेवा आहे. "मुरलेलं लोणचं" पुस्तकाला सुप्रसिद्ध ज्येष्ठ विचारवंत भाई वैद्य यांची प्रस्तावना लाभली आहे.

भाऊंच्या संकल्पित पुस्तकांचीही रचना प्रकाशन विभागाद्वारे सुरू आहे. भाऊंचे विविध क्षेत्रांतील कार्यकर्तृत्व, भाऊंची भाषणे, लेख, कार्यसंस्कृती, पत्रसंवाद, भाऊंच्या पुस्तकांना लाभलेला वाचकांचा साद-प्रतिसाद अशा विविध स्वरूपाची ही पुस्तके आहेत. भाऊंच्या समग्र व्यक्तिमत्त्वाचा वेध घेणाऱ्या चरित्रपर ग्रंथांचीही रचना करण्यात येणार आहे.

### विद्याव्रती व्यासंगी... राजहंसी दृष्टी!

मोठ्याभाऊंकडे लेखक या नात्याने शिक्षण-प्रशिक्षण घेण्याचे सदभाग्य लाभलेल्या माझ्यासारख्या विद्यार्थ्याला त्यांच्या सहवासात खूपकाही शिकता आले. भाऊ विद्याव्रती, व्यासंगी व्यक्तिमत्त्व. जेही काम करणार, लेखन करणार ते अतिशय गांभीर्याने, जबाबदारीनेच पूर्ण करणार, सूक्ष्मातिसूक्ष्म बारकावे लक्षात घेणार, शब्दांच्या छटांचा विचार करणार. जोपर्यंत अचूक-समर्पक, नेमका, चपखल शब्द गवसत नाही, तोपर्यंत त्यांचा शब्दशोध सुरूच राहायचा. एक नाही, दोन नाही तर सात-आठ प्रकारचे शब्दकोश, संदर्भग्रंथ तपासले जायचे. शब्दांच्या प्रभाव-परिणामांची सखोलता-विस्तृतता आणि यथायोग्य उंची लक्षात घेऊनच त्या शब्दाची निवड केली जात असे. त्या- त्या वाक्यात तारतम्य सांभाळून त्या परिसराशी सुयोग्य असणारा शब्द जोपर्यंत आपले स्थान ग्रहण करीत नाही, तोपर्यंत भाऊंच्या मनाची तगमग- तगमग सुरूच असायची. मराठीवरचे त्यांचे प्रभुत्व थक्क करणारे होते. कोणती म्हण, कोणता वाक्प्रचार, कोणती उक्ती, कोठे, कशी योजायला हवी, लवचिकपणे वळवायला हवी याची वाक्यसंयोजनाबाबत राजहंसी दृष्टी भाऊंकडे होती.



*गांधीतीर्थ कठड्यावर क्षणभर विसावलेले मोठे भाऊ*

"ती आणि मी" प्रकाशन सोहळ्याप्रसंगी डॉ. विजया राजाध्यक्ष यांनी भाऊंच्या भाषाशैलीचा जाणीवपूर्वक उल्लेख केला होता. भाऊ भाषणाची पूर्वतयारी कशी करायचे, प्रत्येक भाषणाची प्रस्तावना आगळीवेगळी होण्याबाबत कसे दक्ष राहायचे, पत्रसंवाद साधताना समतोलता कशी राखायचे, एखाद्या पुस्तकाचा मजकूर लिहिताना कितीतरी वेळा बदल कसा होत असे. शेतकरी, कृषिपूरक- पोषक उद्योग आंतरराष्ट्रीय स्तरावर करणारे, राष्ट्रहितैषी, कृतज्ञ व्यक्तिमत्त्व हे सर्वकाही भाऊ होते. "गांधीतीर्थ", "अनुभूती" निर्माण करणारे भाऊ तितकेच व्यवहार चातुर्य बाळगणारेही होते. अशा बहुआयामी व्यक्तिमत्त्वाचा प्रत्येक शब्द मोजून-मापून-बांधेसूदपणे अवतरणारा. एकूणच हे सर्व विषय स्वतंत्र अभ्यास विषय आहेत.

### शब्दाशब्दांचे जाणिले महत्त्व अन् महात्म्य

भाऊ आयुष्यभर सरस्वतीची साधना करीत राहिले. प्रज्ञा-प्रतिभेच्या तेजस्वितेमुळे त्यांचा सन्मान झाला आणि आगळ्यावेगळ्या कार्यसंस्कृतीमुळे भाऊंवर "लक्ष्मी" कायम प्रसन्न राहिली. भाऊंनी शब्द केवळ कागदावर लिहिले नाहीत, तर गुणसंपदेच्या शक्तिशाली स्रोतांसह ते शब्द साक्षात सजीव केले. "आधी केले; मग सांगितले!" असेही अनेकदा घडले. त्यामुळे भाऊंच्या शब्दाला अनमोल असे महत्त्व आणि महात्म्य प्राप्त झाले. "चांगली पुस्तकं, चांगली माणसं शोधत राहायला पाहिजे. कारण, तीच खरी श्रीमंती!" असे कृतिशील विचार जोपासणाऱ्या भाऊंविषयी कृतज्ञता व्यक्त करून ही शब्दपूजा त्यांच्या चरणी अर्पण करतो...

# मोठ्या भाऊंचे अंतरंग





**डॉ. सुगन बरंठ**
वरिष्ठ गांधीयन
अध्यक्ष - नई तालीम समिती, वर्धा

मोठे भाऊ म्हणजे भवरलाल जैन यांच्या बाबतीत लिहिणे सोपे ही आहे आणि अवघड ही. सोपे या अर्थाने की बाहेरील त्यांच्या कार्यक्रमाबद्दल लिहिणे व अवघड या अर्थाने की हा माणूस आतून काय होता.

भाऊ गांधीजींच्या जीवनापासून शिकले तसे ते त्यांच्यात उपजत ही तसे असावे ते आहे. 'भाऊ हे कर्मयोगी होते' हा एक भाग. दुसरा, ते वेळेच्या व्यवस्थापनाबाबत स्वत:विषयी अत्यंत कठोर होते. तिसरे, ते सरस्वतीचे उपासक होते. चौथे, ते स्त्री शक्तिचे जाणकार होते. पाचवे, ते शरीरश्रम हलके किंवा कमी दर्जाचे समजत नसत. सहावा, भाऊ जीवनात एकाच गोष्टीला


रॉकेल विक्रीच्या धंद्याने जैन इरिगेशनच्या व्यवसायाची मुहूर्तमेढ

चिटकून नाही राहिले. ते सतत विकसनशील होते. असे बरेच गुण आपल्याला त्यांच्या जीवनात आढळतील.

मोठे भाऊ कर्मयोगी होते पण सुरेश भटांच्या कवितेप्रमाणे "रंगात सर्व रंगुनी। रंग माझा वेगळा।। व गुंत्यात गुंतून साऱ्या। पाय माझा वेगळा।।" भाऊ अडकले कशातच नाहीत. त्यांनी बोललेले प्रेरक विचार आपण पहिले तर रोज त्यातून एक ऊर्जा मिळते, ते आपण लिहून घेतले तर पावलो पावली मदतीचे आहेत हे जाणवते.

कर्म आणि योग या दुर्लभ गोष्टी. प्रत्येक जण जीवनभर कार्य करीतच असतो, प्रसंगी शरीराला, परिवाराला दुय्यम स्थान देवून भाऊ हे कर्म करीत राहिले. गांधींचे एक प्रसिद्ध वाक्य आहे "मेरे जाने के बाद कोई मेरा पूर्ण प्रतिनिधित्व नही कर सकेगा पर आप में से हर एक मे मेरा अंश होगा. अगर आप स्वार्थ को दुय्यम स्थान और कर्तव्य को प्राथमिकता दोंगे तो यह कमी पुरी हो सकेगी."

भाऊंनी काय काय केले नाही? खताच्या, रॉकेलच्या, गॅसच्या गाड्याखाली करण्यापासून इतके मोठे जैनचे साम्राज्य उभे करण्यापर्यन्त. केवळ कर्मयोगी व्यक्तीलाचा हे संभव आहे. हे करीत असताना त्यांनी सामाजिक जाणीव जपली. आपल्या सहकाऱ्यांची काळजी घेत हे केले.

भागवतमध्ये एक गोष्ट आहे. भक्त देवाला सांगतो 'देवा! माझ्याकडे तुपाला पैसे नाहीत मी दिवा लाऊ शकत नाही' देव म्हणतो मग भजन म्हण  भक्त सांगतो 'देवा मला गळा नाही, गाता येत नाही काय करु.' देव म्हणतो पण तू खालील तेरा झाडे जगवू शकतोस ? देव त्याला वृक्षांची सूची देतो भक्त म्हणतो हो 'हे शरीर मेहनतीचे काम मी नक्की पूर्ण करीन. देव म्हणतो "मग मी तुला भेटेल." तो तेरा झाडे लावतो व जगवतो आणि देव त्याला भेटतो. भाऊंनी किती झाडे जगवली ते आपण सर्व पाहतोच.

भाऊंनी कधी ही शरीर श्रमाची लाज ठेवली नाही. आपण एमपीएससी आहोत मग ही हलकी गणली जाणारी शरीर श्रमाची कामे कसे करू? असे त्यांना कधीही वाटले नाही. अगदी चालता चालता कुठली लोखंडाची भंगार वस्तु दिसली तरी ते उचलून घेत. आपल्याला 'तेंव्हा आणि आता' हे वाचतांना हे दिसते.

वेळेच्या बाबतीत भाऊ किती कठोर होते हे त्यांचे कार्यक्रम ज्यांनी आयोजित केले त्या सर्वांना माहीत आहे. महावीराच्या बहुदा उत्तरध्यान सूत्रात हे दिसते. महावीर म्हणतात " समयं गोयम मा पमाय ये " (हे गौतम, त्यांचा प्रधान शिष्य, समय मात्र भी प्रमाद मत करो) म्हणजे वेळ जराही व्यर्थ दवडू नकोस. आपल्याला एक जीवनात इतकी भरारी घेणे हे या तत्वाशिवाय कसे शक्य आहे? या करिता गांधी आणि घड्याळ हा लेख वाचा. पहा तो गांधीतीर्थच्या अरकाईव्हज मध्ये आहे, मी ही पाठवू शकतो.

ही अत्यंत दुर्मिळ गोष्ट आहे की, व्यवसाय करणारी व्यक्ती सरस्वतीची उपासक असू शकतो. हे मला सर्वत्र पाहायला मिळते,



भाऊ स्वत: फॅक्टरीत काम करताना

अगदी भारतभर. सर्व जाती जमातीत. आपण पाहतो की व्यवसाय करणारे लोक पैसे अधिक झाले तर कायम व्यसनांच्या आहारी जातात. भाऊंनी किती पुस्तके लिहिलीत हे पाहिले की आपणास कळते. ते स्वतः मराठी साहित्य संमेलनात पुस्तक विक्रीच्या दुकानावर बसत व मंचावर ही बोलत.

विनोबा नेहमी म्हणत - ‘काम करून पहिला रुपया मिळाला तर काय करणार?’ लोकांनी सांगितले ‘पोटाला खाणार’

दूसरा रुपया मिळाला तर? लोक म्हणाले ‘अंग झाकायला घेणार’

तिसरा रुपया मिळाला तर? लोक बोलले ‘घर बनविणार’

चौथा रुपया मिळाला तर  सर्वांनी वेगं वेगळी उत्तरे दिली, कुणी म्हणाले ‘गरीबांना मदत करणार’. कुणी म्हणाले ‘शिक्षणात मदत करणार’. कुणी म्हणाले ‘आरोग्यात मदत करणार’, वगैरे वगैरे.

मग विनोबा म्हणाले “चौथा रुपया आपल्या व्यवसायाच्या मदती करीता ची पुस्तके घ्या. म्हणजे आपल्या व्यवसायाची औजारे घ्या.”



*शेती हा तर घरचा मुळ व्यवसाय त्याची कास सोडून कसे जमेल?*

"पांचवा रुपया मिळाला तर काय करणार?" विनोबांनी विचारले. लोक चूप होते. विनोबा म्हणाले "जीवनाला आकार देणारी पुस्तके घ्या " आणि सहावा रुपया मिळाला तर "मनोरंजन करा." भाऊची लायब्ररी आपण पाहतो.

भाऊ स्त्री शक्तिचे जाणकार होते हे आपल्याला त्यांच्या 'ती आणि मी' वाचतांना जाणवते. त्यांनी तर अगदी निजी गोष्टी ही यात लिहिल्या होत्या. पण फार जवळच्या लोकांनी प्रतिक्रिया दिल्याने त्यांनी त्या काढून टाकल्या. इतके ते प्रांजळ आणि सत्य हाच धर्म, हीच नीती मानणारे होते. कारण त्यांनी गांधीजींच्या "माझे सत्याचे प्रयोग" चे मूळ गुजरातीत, मराठी. हिन्दी आणि इंग्रजीत 14 वेळा सामूहिक वाचन केले होते.

याचे दुसरे जाहीर उदाहरण म्हणजे ती हात जोडलेली वर्तमान पत्रातील (आता नेमकी तारीख आठवत नाही) पण ती जाहिरात महाराष्ट्रभर आली होती. एक व्यक्ति मला कोल्हापूरहून येतांना रेल्वेत भेटल त्याने सांगितले 'जैसे ही भाऊ आ जाएंगे अमेरिका से, ये जैन पर के काले बादल दूर हो जाएंगे.' त्याच्या जवळ एक संगमरवरी नांवाची पाटी होती. तो पुढे म्हणाला "अब यही देखो अगर ऐसी पाटी भाऊ के पास होती और वह टूट जाती तो वे ईसे जोडने की सोचते या इसका कुछ और हो सकता है क्या यह देखते। फेंक नही देते। " ते गृहस्थ म्हणाले, मोठे भाऊ इतके सर्जनशील होते की ते नेहमी, अगदी कुणाच्याही पासून केंव्हाही शिकत असतं. त्यांच्या दोन गोष्टीत अंतर जाणवले तर नंतर ची गोष्ट खरी मानायची. याचे कारण ते गुण ग्राहक होते. प्रत्येकात काही ना काही गुण असतोच असतो हे जीवनाचे मर्म त्यांनी जाणले होते.

गांधीजी नेहमी शेतकऱ्यांसाठी उपलब्ध असत तोच पायंडा त्यांनी जैन मध्ये ठेवला आहे. जे केले ते शेतकऱ्यांसाठी व किती ही लहान शेतकरी असला तरी तो भाऊंना सहज भेटू शकत होता. ते नेहमी म्हणत "किसान को पानी दों वह माटीसे सोना उगायगा." ते कायम याच एका गोष्टीचे आग्रही होते की कसे शेतकऱ्याच्या बांधापर्यन्त पाणी जाईल. असे बाकीचे गुण किती तरी आहेत. दलू बाबा (दलीचंद जैन, मोठे भाऊंचे काका) नेहमी म्हणत " भाऊला तर 'भारत रत्न' मिळायला हवा." याचा अर्थ समझावा लागेल.

# खोज गांधी की बडे भाऊ की दिशा





**डॉ. सुदर्शन आयंगार**
पूर्व कुलगुरू - गुजरात विद्यापीठ
संचालक - गांधी रिसर्च फाउण्डेशन, जलगॉंव

**बडे भाऊ के जीवन में दो स्त्रीओं का बहुत प्रभाव रहा ऐसा जान पडता है। एक उनकी माता और दूसरी उनकी पत्नी। अपने और अपनी पत्नी के बारे में यथेष्ट मुक्तता से उन्होंने मराठी में आत्मकथात्मक स्वरूप में एक पुस्तक लिखी है जो किसी राजस्थानी मूल के व्यक्ति द्वारा मराठी में लिखी गयी श्रेष्ठ साहित्यिक कृतिओं मे गिनी जाती है।**

गांधीजी जीवनभर खुद खोजी रहे और मानवता को सत्य की खोज का संदेश देते हुए विदा हुए। इस संदेश के प्रति किसे कब लगन लग जाय कहना मुश्किल पर लग जाये तो 'लागी छूटे ना' वाला किस्सा ही होता है। श्री भवरलाल जैन से, जो आदर से बडे भाऊ के नाम से जाने जाते रहे, मैं जब पहली बार मिला तब वे उम्र के सत्तरवें दशक में प्रवेश कर चुके थे। दरमियाना कद, छरहरा बदन, लकदक सफेद खादी के वस्त्र जिसमें उत्तरीय तो आधी बाँह का छोटा कुर्ता और नीचे पायजामा यह था उनका पहला दर्शन। हज़ारों करोडों रुपयों के मूल्य की औद्योगिक व्यवस्था अपनी माँ के दिये हुए सात हज़ार रुपये और आशीर्वाद से शुरू कर के खडी करने वाला इतना सादा जीवन बिता रहा था यह पहली नज़र में ही दिख जाता था। एक और बात बरबस ध्यान खींचती थी। उनकी आँखो की शीतलता और चेहरे पर कांति जो उनकी आंतरिक अध्यात्मिक यात्रा प्रकट करते थे। उनकी सत्य के खोज की यात्रा आरंभ हो चुकी थी। उम्र के किस पडाव पर यह यात्रा शुरु हुई यह कहना मेरे लिए तो संभव नही है, परंतु वे खोजी थे और इस खोज में उन्होंने जन्म से जैन धर्मी होने के नाते किसी जैन साधु से प्रेरित होकर मोक्ष मार्ग पर प्रशस्त होने के



*आई गौराई आणि पत्नी कांताबाई या दोघींचाही भाऊंच्या जीवनावर खूप प्रभाव होता. वडिल हिरालाल हे तर गुरू समानच होते.*

लिए इहलोक को त्यागने की कोई बात नहीं की। वे किसी और साधु संत के फेरे में भी आये हों ऐसा प्रतीत नहीं हुआ। बडे भाऊ ने गांधीजी के सत्य की खोज के संदेश को ग्रहण कर लिया था और उसका आत्मसात करते हुए उस खोज के मार्गी जान पडते थे। उनके चेहरे की कांति ही इसका प्रमाण है।

बडे भाऊ के जीवन में दो स्त्रीओं का बहुत प्रभाव रहा ऐसा जान पडता है। एक उनकी माता और दूसरी उनकी पत्नी। अपने और अपनी पत्नी के बारे में यथेष्ट मुक्तता से उन्होंने मराठी में आत्मकथात्मक स्वरूप में एक पुस्तक लिखी है जो किसी राजस्थानी मूल के व्यक्ति द्वारा मराठी में लिखी गयी श्रेष्ठ साहित्यिक कृतिओं मे गिनी जाती है। गांधी विचार की बुनियादी समझ श्री जैन में खूब थी। गांधीजी ने महाराष्ट्र में कुल मिलाकर १२ साल से कुछ ज़्यादा समय ही वास किया होगा और इस बीच खानदेश

और विदर्भ के राजस्थानी-मारवाडी कुटुंबो में उनका प्रभाव देखते ही बनता है। इस तथ्य की ओर मेरा ध्यान दादा धर्माधिकारी के पुत्र न्यायमूर्ति चन्द्रशेखर धरमाधिकारी ने दिलाया! उसी श्रृंखला में खानदेश के यानी जलगाँव जिले के वाकोद गांव के श्री. भवरालाल जैन भी आते हैं। जैन बनिया होने के नाते एक अच्छा व्यापारी और एक सफल उद्योगपति होना उनके लिये सहज था। परंतु एक सफल उद्योगपति ने अपने विचार और आचरण में गांधीजी के विचारों को प्रमुखता दी यह श्री भवरलालजी याने बडे भाऊ की ही विशेषता रही। आज़ादी के उत्तरकाल में गांधीजी की ट्रस्टीशिप के विचार और भावना को समझकर उसका अनुपालन करने के बहुत ही कम उदाहरण देखने को मिलते हैं। श्री जैन इस विचार के प्रमुख पुरस्कर्ता रहे और अपनी निजी संपत्ति को उन्होंने गांधीजी के विचार के प्रबोधन में और रचनात्मक कार्यों के अमल में लगाया।

अपने निर्वाण के लिये सत्य की खोज मनुष्य समाज की समस्याओं के हल के लिये काम करते हुए करना और इस तरह व्यक्ति, समष्टि और प्रकृति के बीच संवादिता स्थापित करने की दिशा में योगदान देना ही मनुष्य की आध्यामिकता है। गांधीजी की



*थोर गांधीवादी विचारवंत न्या.चंद्रशेखर धर्माधिकारी यांच्यासमवेत मोठे भाऊ आणि स्नुषा भावना भाभी, ज्योती भाभी व निशा भाभी*

इस विभावना से भावात्मक और बौद्धिक जुडाव होने के कारण उन्होंने सामाजिक कार्य में अपनी खोज देखी और आरंभ की। इस सिलसिले में ही श्री भवरलाल जैन ने गांधी रिसर्च फाउन्डेशन (जी.आर.एफ.) की स्थापना की और एक भव्य और सुन्दर गांधी स्मारक बनाया जिसमें गांधीजी के जीवन व घटनाओं की झांकी मिलती है। स्मारक में बनाया हुआ प्रदर्शन अद्यतन टेक्नॉलॉजी के उपयोग का नमूना है। एक स्मारक बनाना एक संपत्तिवान उद्योगपति के लिये आसान काम होता है परंतु विचार प्रबोधन के लिये अनुसंधान, और तालीम सभी को जोड कर गांधी विचार आधारित शिक्षा की नींव रखी। गाँव उनके हृदय में बसता था और ग्रामवासीओ और खेतिहरों की समृद्धि के लिये उन्होंने जीवन भर श्रम किया और काफी हद तक सफल रहे। गांधी विचार और नैतिक जीवन के मूल्यों को प्रतिष्ठित करना हों तो वह प्रक्रिया बाल्यकाल से ही प्रारंभ होती है, श्री जैन के इस दृढ विश्वास का प्रतिफल उनका 'अनुभूति' शाला का प्रयोग है। इस प्रयोग में सिर्फ श्रीमंत मां-बाप के बच्चे ही जा सकते थे ऐसा जब जान पडा



*जगातील सर्वोकृष्ठ अशा महात्मा गांधीचे स्मारक पाहण्यासाठी जळगावला अलोट गर्दी झाली नाही तर नवलच !*

तो जलगाँव शहर के निर्धनों के बच्चों के लिये भी अनुभूति शाला-दो खोल दी।

इस तरह उनका एक स्वपन गांधीजी के जीवन और कवन पर एक अत्याधुनिक प्रदर्शनी बनाना, उनके जीवन संबधित सारे दस्तावेज, उनका संपूर्ण वांग्मय, उनके जीवन काल की दृश्यश्राव्य सामग्री बटोरना, उसे संचित और सुरक्षित करना था। इस कार्य के लिये उन्होंने अपनी निधि लगाई और आज वह वैश्विक स्तर पर बिरदाई जाय ऐसी प्रदर्शनी है और एक अनूठा संग्रह है। किसानों की खुशहाली के लिये तो उन्होंने उद्योग ही खडा कर दिया, परंतु पूरक रोजगार और पूर्ण वैकल्पिक रोजगार गाँवों में उपलब्ध हो उसके लिये ग्रामोद्योगों की पुनः प्रतिष्ठा और स्थापना उनका दूसरा स्वपन था। कपास से खादी के कपडे तक की यात्रा आज भी दुरूह है, उसका आर्थिक गणित बैठता ही नहीं। इसमें तकनीक और टेक्नॉलॉजी दोनों की गुंजाईश है। जी.आर. एफ. ने इस दिशा में कुछ ठोस कदम उठायें हैं। खादी के उत्पादन की हर प्रक्रिया में अनुसंधान जारी है, आसपास के कई गाँवों में ग्रामोद्योग के प्रयोग भी जारी हैं। उनका तीसरा स्वप्न था कि गांधी विचार पर और आगे अनुसंधान हो और जी.आर.एफ. विश्व कक्षा की विचार अनुसंधान, तालीम और शिक्षा की संस्था बने। गांधी विचार की परीक्षाएं बच्चों से आरंभ कर तरुणों युवाओं तक आयोजित की जा रही हैं। सालाना दो लाख कि औसत से आज तक आठ लाख से अधिक बच्चों ने गांधी परीक्षाओं में हिस्सा लिया है। गांधी विचार के परिप्रेक्ष्य में उच्च शिक्षा और वैश्विक स्तर का अनुसंधान होना अभी बाकी है।

बडे भाऊ का पहला स्वप्न तो अच्छे से संपन्न हो पाया है, आने वाली पीढ़ियों का यह कर्त्तव्य रहेगा कि स्मारक, प्रदर्शनी और संचित सामग्री का योग्य रख-रखाव बना रहे। बाकी दो स्वपनों के लिये अभी बहुत मेहनत करना शेष हैं। बडे भाऊ के बाकी दोनों स्वप्न योग्य ऊंचाई तक ले जाकर साकार करना ही उनके सहयोगियों द्वारा उन्हें दी जाने वाली श्रद्धांजलि होगी।

# १२५ वर्षांची मातीची कहाणी

(१८९७-२०२२)



राजस्थानातील
मारवाड-आगोळाई गावातून पाण्याच्या शोधात
दोन युवक बाहेर पडले.
ते साल होतं १८९७ सव्वाशे वर्ष झाली या गोष्टीला.
जवारमलजी आणि धाकटा छोटमलजी.

जोडी थेट पोचली अजिंठ्याच्या
पायथ्याशी. मुक्काम वडाळी - वाकोद,
जिल्हा जळगाव. हाती रिकामा लोटा,
उरात अफाट जिद्द. रुजलेल्या कठोर परिश्रमाचा बांधा,
भविष्य घडविण्याची अपरंपार उमेद.

जवारमलजींची तीन अपत्यं, सागरमलजी,
मुकनचंदजी, हस्तीमलजी. सागरमलजींचे चिरंजीव
हिरालालजी यांचा नित्यकम-

रामप्रहरी धार काढून गडी-माणसांना
उठवायचं, उन-पाऊस-वारा यांची तमा न
बाळगता चालायला लागायचं. शेती-माती करायची,
धान्य-दाण्याची देवघेव करायची. पै-पैका शिलकी टाकायचा.
पुनः शेतीतच लावायचा.

शेती वाढवायची.

*मोठ्या एकत्र कुटुंबाला गुण्यागोविंदानं नांदवायचं.*

(राणीदानजी, बन्सीलालजी, दलीचंदजी, शिवराजजी व त्यांचे परिवार)

हे सगळं करत असताना माणुसकी जपायची. प्रेम द्यायचं, सग्या-सोयऱ्यांपेक्षा
शेजार, शहरापेक्षा गाव जवळचं मानायचं. धनाजी वानखेडे असो वा नामदेवराव देशमुख अर्ध्या
रात्रीही परस्परांच्या हाकेला धावून जायचं! कै. हिरालालजी व गौराबाईच्या कुंडल्यात विचित्र
ग्रहांची युती. ओळीनं चार अपत्यं जगली नाही म्हणून पाचवं हरिजनाच्या ओटीत टाकलं, जगलं.
त्याचं नाव भवरलाल, धाकटा कांतीलाल.



आजही तळागाळातल्या माणसाबद्दल व जळगावबद्दल प्रेम, कृतज्ञता, त्यांनीच हे जीवन दिलं ही
भावना कायम दिसून येते. त्यांचे पांग याच जन्मात फेडायसाठी सारखी तळमळ, आकांक्षा, धडपड.

वाडवडिलांनी पाण्यासाठी दाहीदिशा शोधल्या. भवरलालजींनीही तोच ध्यास घेतला.

पाणी नियोजनाचा.

पिढ्यापिढ्यांना जोडणारा हाच अंतरीचा धागा !

त्याला जोड दिली नवतंत्राची, ज्ञानाची, संशोधनाची, मातीच्या बांधिलकीचं तर बाळकडूच होतं.
निष्कलंक चारित्र्य हा वारसा. साधेपणा आणि सदाचार रक्तातच होता. त्यांचं जगणं खुल्या पुस्तकासारखं,

कुणाला कोणी शिकवलं नाही. परस्परांकडे पाहूनच ते आपसूक घडत गेले.

हा हा म्हणता रोपट्याचा कल्पवृक्ष झाला. पुढची पिढी आली.

भवरलालजींचे अशोक, अनिल, अजित, अतुल व कांतीलालजींचे अभय, अविनाश

वारसा सांगूनच मोठी झाली.

डोक्यावरची पगडी गेली, टोपीही गेली, हातात मोबाईल व प्रसंगी गळ्यात टाय आला. बैलगाडी गेली. विमानं आली.

- शेती आधारीत व्यवसाय मात्र कायम राहिले. वाढले.
आता चौथी पिढी आली. अथांग अभेद्य, अभंगसुद्धा त्याच व्यवसायात जुडली.
आत्मन आणि अन्मय याच वाटेवर येतील...

अजूनही भली पहाट सोबत्यांच्या साथीनंच उगवते.

आजही अशोकजींच्या बरोबर 'घनश्याम सुंदरा श्रीधरा, अरुणोदय झाला' भूपाळीसह कोवळया उन्हातल्या
ऋचा कानावर घेत अर्थम्, भवरलालजींचा पणतू पहाट आनंददायी करतो...

सव्वाशे वर्षांच्या कहाणी, परंपरेची, साठा उत्तरांची, सुफळ तर झालीच पण निरंतर प्रवाहितही आहे...
जगण्याला अर्थ देणाऱ्या थेंबापासून शाश्वततेचा भावार्थ देणाऱ्या तीर्थापर्यंत...


जैन इरिगेशन सिस्टीम्स् लि.
*कल्पना कणापरी. ब्रह्मांडाचा भेद करी.*®
www.jains.com


आज १२ डिसेंबर श्रद्धेय भवरलालजींच्या श्रद्धावंदनदिनी त्यांना जैन परिवार, सर्व सहकारी यांच्या वतीने कृतज्ञतापूर्वक प्रणाम!

Post Regn. No.: JAL/417/2022-2024
Published on 19th of every month, posted on 28th of every month at Jalgaon-425001

RNI NO. MAHMAR/2018/76944



## भवरलालजी जैन
## आपलं अवघं जगणं वटवृक्षासम

आपलं अवघं जगणं भूमीत घट्ट पाय रोवून
उभ्या असलेल्या वटवृक्षासमान!
कडाक्याचं ऊन असो, सोसाट्याचा वारा असो.
चक्रीवादळ येवो वा धुवांधार वृष्टी,
वृक्ष सारं काही सहन करतो आणि नव्या उमेदीनं फुलत-फळत राहतो!

वृक्षाची गुणसत्त्वं आपल्याही व्यक्तिमत्त्वात पुरेपूर ठासलेली.
पानाफुलाफळांची, हिरवाईनं नटलेली सृष्टी आपण उभी केली.
कठोर परिश्रमानं, आरोग्याची पर्वा न बाळगता
रात्रंदिवस आपण राबराब राबत राहिलात.

सहकाऱ्यांना विस्तारित परिवाराचे आत्मीय घटक मानून,
सचोटीचे सत्त्वगुण असलेली अनोखी कार्यसंस्कृती त्यातून निर्माण केली.

वादळातही प्राणपणानं, पारदर्शकतेनं,
एकजुटीनं. दृढ निश्चयानं. घरटी जपायची हीच आपली शिकवण,
हाच आपण आयुष्याच्या वाटचालीतून दिलेला संस्कार,
'कष्टाचच जगणं सार्थक असतं' हाच वसा आणि वारसाही!

*- रमेश महाजन (शिवम मार्केटिंग, अमळनेर)*

जैन इरिगेशन सिस्टीम्स् लि.
कल्पना कणापरी. ब्रह्मांडाचा भेद करी.®

जैन प्लास्टिक पार्क, रा.म.क्र. ६, पो.बॉ. ७२, जळगाव-४२५००१. (महाराष्ट्र.)
**दूरध्वनी:** ०२५७-२२५८०११; **ई-मेल:** krushitirth@jains.com; संकेतस्थळ: www.jains.com

**मुद्रक, प्रकाशक मनिष अमृतलाल शहा** यांनी जैन इरिगेशन सिस्टीम्स् लि. जळगाव यांच्यावतीने आनंद पब्लिकेशन, १०६/१/ए, एन. एच. क्र.६, मुसळी फाटा, ता. धरणगाव, जि. जळगाव (महाराष्ट्र) येथून छापून जैन प्लास्टिक पार्क, पोस्ट बॉक्स नं.७२, बांभोरी, जळगाव-४२५००१ येथून अंक प्रकाशित केला आहे.
**संपादक: डॉ. सुधीर जगन्नाथ भोंगळे**; वर्ष: ५; अंक: १२ (४२) (डिसेंबर २०२२/ या अंकात प्रसिद्ध झालेल्या मतांशी संपादक व संचालक सहमत असतीलच असे नाही.)

कृषीतीर्थ मासिकाची
डिजीटल आवृत्तीसाठी
कोड स्कॅन करा